# दैनिक अधिकारनामा

विदर्भातील सर्वाधिक पसंतीचे दैनिक

Email : adhikarnama2021@gmail.com Web : www.adhikarnama.in

मुख्य संपादक : निलेश बा. किरतकार मो. ९६६५३८२७८०, ९७६६३८२७८० कार्यालय : दै. अधिकारनामा, विवरा जि. अकोला – ४४४५११

अकोला * सोमवार दि. ०५ सप्टेंबर २०२२ * वर्ष २ रे * अंक १३ * किंमत २ रुपये * RNI Title Code No. : MAHMAR50842


## सायरस मिस्त्री यांच्या अपघाताची चौकशी करा; फडणवीसांचे पोलीस महासंचालकांना आदेश

**दै. अधिकारनामा**

**मुंबई :** टाटा सन्सचे माजी प्रमुख सायरस मिस्त्री यांचं अपघाती निधन झाल्याने उद्र्योगक्षेत्राला मोठा धक्का बसला आहे. सायरस मिस्त्री यांच्या निधनानंतर सर्वच क्षेत्रांकडून हळहळ व्यक्त होत आहे. त्यांच्या अकाली मृत्यूमुळे पंतप्रधान नरेंद्र मोदींनाही धक्का बसला आहे. दरम्यान, राज्याचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्याच्या पोलीस महासंचालकांना अपघाताची चौकशी करण्याचे आदेश दिले आहेत. ट्विटरवरुन त्यांनी ही माहिती दिली आहे. पालघरमधील चारोटी येथे झालेल्या अपघातात सायरस मिस्त्री यांनी आपला जीव गमावला. अपघातानंतर जागीच त्यांचा मृत्यू झाला अशी माहिती मिळत आहे. दुपारी सव्वा तीन वाजण्याच्या सुमारासा सूर्या नदीवरील पुलावर चालकाचा ताबा सुटल्याने दुभाजकाला कार आदळून हा



अपघात झाला. अपघातात सायरस मिस्त्री यांच्यासह आणखी एका व्यक्तीचा मृत्यू झाला आहे. दरम्यान दोघे जखमी असून त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आलं आहे.

"प्रख्यात उद्र्योगपती सायरस मिस्त्री यांच्या निधनाने उद्र्योग आणि आर्थिक जगताची मोठी हानी झाली आहे. भारताची आर्थिक शक्ती ओळखणारे, एक उमदे असे ते व्यक्तिमत्व होते. विनम्रता हा त्यांचा स्थायीभाव होता. मी त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करतो. त्यांच्या कुटुंबियांच्या, आप्तस्वकियांच्या दुःखात आम्ही सहभागी आहोत," अशा भावना फडणवीसांनी व्यक्त केल्या आहेत. "पालघरनजीक झालेल्या या दुर्दैवी अपघाताबाबत माहिती घेतली असून राज्याच्या पोलीस महासंचालकांना या अपघाताची सखोल चौकशी करण्यास सांगितलं आहे," अशी मााहिती यावेळी त्यांनी दिली. दरम्यान पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासहित अनेक राजकीय नेत्यांनी ट्वीट करत शोक व्यक्त केला आहे. "टाटा सन्सचे माजी प्रमुख सायरस मिस्त्री यांच्या निधनाचे वृत्त ऐकून धक्का बसला. सायरस मिस्त्री हे केवळ एक यशस्वी उद्र्योजक नव्हते तर उद्र्योग विश्वातील एक तरुण, उमदे आणि भविष्यवेधी व्यक्तिमत्त्व म्हणून त्यांच्याकडे पाहिले जात होते. एक कर्तबगार उद्र्योजक आपल्यातून गेला आहे. ही केवळ मिस्त्री कुटुंबियांची नव्हे तर देशातील उद्र्योग विश्वाची मोठी हानी आहे. माझी त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली," अशा भावना एकनाथ शिंदे यांनी व्यक्त केल्या आहेत.

## 'मिशन लोटस'साठी भाजपचे शिंदे गटावर लक्ष

**दै. अधिकारनामा**

**रत्नागिरी :** 'मिशन लोटस' राबविण्यासाठी चिपळुणातील भाजप परिवाराने राजकीय डावपेचांना सुरुवात केली आहे. त्यानुसार आगामी जिल्हा परिषद, पंचायत समिती, नगरपालिका आदी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सार्वत्रिक निवडणुकीत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे गटासोबत युती करण्याची छुपी तयारी भाजपकडून सुरू झाली आहे. त्यासाठी चिपळूण मतदारसंघात शिंदे गटात कोण सहभागी होणार यावर लक्ष ठेवले जात आहे. राज्य शासनाने नगराध्यक्षपद जनतेतून निवडणूक देण्याबाबत घेतलेल्या निणऱ्याचा फायदा घेण्यासाठी चिपळुणातील भाजप परिवार सज्ज झाला आहे. त्या अंतर्गत चिपळुणात मिशन लोटस अभियान राबविण्याकरिता हालचाली सुरू झाल्या आहेत. गतवेळेच्या निवडणुकीत थेट नगराध्यक्षपदी भाजपचे उमेदवार विजयी झाले होते. त्याचा फायदा न.प.वर सत्ता मिळविण्यात झाला




होता. त्याच पद्धतीने पुन्हा एकदा न.प.वर सत्ता मिळविण्यासाठी मिशन लोटस अंतर्गत भाजपने राजकीय डावपेचांना सुरुवात केली आहे. यावेळी मिशन लोटस अंतर्गत राज्यातील एकनाथ शिंदे गट आणि भाजप अशी सत्ता सूत्रे स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीतही वापरण्याच्या हालचाली आणि डावपेच आखले जात आहेत.

सद्र्यःस्थितीत चिपळुणात ठाकरे समर्थक गटाच्या मूळ शिवसेनेची ताकद मोठी आहे. तरीदेखील राज्यातील आघाडी सत्तांतरानंतर ना. शिंदे गटामध्ये मूळ सेनेतील काही प्रमुख पदाधिकारी व शिवसैनिक छुप्या पद्धतीने कार्यरत आहेत. प्रत्यक्षात मूळ शिवसेनेत वावरत असल्याचे दाखवून अंतर्गत राजकारणात शिंदे गट बळकट करून सक्रिय करण्यासाठी हालचाली सुरू झाल्या आहेत. या सर्व घडामोडींवर चिपळुणातील भाजप परिवाराकडून लक्ष ठेवले जात आहे. सार्वत्रिक निवडणुकीचा बिगुल वाजल्यावर छुप्या पद्धतीने कार्यरत असलेला शिंदे गट सक्रिय झाल्यास त्याच्यासोबत राज्यातील शासनाप्रमाणेच स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीत युती करण्याची तयारी परिवाराने सुरू केली आहे. शहरात मिशन लोटस अंतर्गत जास्तीत जास्त प्रभागात भाजपचे नगरसेवक वाढविण्याच्या दृष्टीने शिंदे गटाला नगराध्यक्ष व भाजपकडे उपनगराध्यक्ष पदासह जास्तीत जास्त नगरसेवकांची संख्या, असे सूत्र राबविले जाण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. भाजपमध्ये नगराध्यक्षपदासाठी सद्र्यः स्थितीत माजी नगरसेवक विजय चितळे, शहर अध्यक्ष आशिष खातू, माजी नगरसेवक बाबू तांबे, माजी उपनगराध्यक्ष निशिकांत भोजने हे प्रमुख दावेदार आहेत. प्रत्येक इच्छुकाकडून सुरुवातीला आपापला प्रभाग मजबूत करण्याबरोबरच शहरातील अन्य प्रभागातील हितचिंतक मतदारांपर्यंत पोहोचण्याचे उपक्रम सुरू करण्यात आले आहेत. त्याचप्रमाणे शिंदे गटात सक्रिय होणाऱ्या सेनेतील काही शिवसैनिक पदाधिकारी यांच्याशी काही इच्छुकांनी राजकीय संधान बांधण्यास सुरुवात केली आहे.

## सात महिन्यांनंतर तरुणाच्या खुनाचा उलगडा

**दै. अधिकारनामा**

**नगर :** उसने पैसे देण्याच्या बहाण्याने २५ वर्षीय तरूणाला बोलावून घेत त्याला जास्त दारू पाजली. त्यानंतर त्याला मोटारसायकलवर बसवून श्रीगोंदा तालुक्यातील कुकडी कॅनॉलजवळ नेऊन पाण्यात फेकून देत त्याचा खून केला. अतिशय थंड डोक्याने कट रचत, फिल्मी स्टाईलने केलेल्या या खुनाला नगरच्या स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने अखेर सात महिन्यांनंतर वाचा फोडली असून, दोघांच्या मुसक्या आवळल्या आहेत. सागर कुमार झरेकर (वय २५ रा. घोसपुरी ता. नगर) असे मयत तरूणाचे नाव आहे. तो दि.१४ जानेवारी २०२२ पासून घरातून गायब झाला होता. त्याच्या घरच्यांनी नगर तालुका पोलिस ठाण्यात हरवल्याची तक्रार दाखल केली होती. त्याचा दोघांनी खून केला असल्याची माहिती तब्बल ७ महिन्यांनंतर समोर आली असून, स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने विश्वनाथ ऊर्फ सुशांत सोपान भापकर (वय २८, रा.भापकर वस्ती, कोळगाव ता. श्रीगोंदा) व त्याचा मित्र गौरव गोरक्ष साके (वय २० रा. साकेवाडी, ता. श्रीगोंदा) या दोघांना जेरबंद केले. या खून प्रकरणाची पोलिस सूत्रांकडून मिळालेली माहिती अतिशय धक्कादायक आहे. मयत सागर झरेकर व आरोपी विश्वनाथ ऊर्फ सुशांत भापकर यांची ओळख होती. काही वर्षांपूर्वी मयत सागरच्या नातेवाईक तरूणीचे श्रीगोंदा तालुक्यातील एका गावात लग्न झाले. मात्र, आरोपी भापकर तिला प्रेमसंबंध ठेवण्यासाठी त्रास देत होता. परंतु, तिने त्यास नकार




दिला. तिला अद्दल घडविण्यासाठी आरोपी भापकर याने प्रयत्न केले. अनेकदा त्रास दिल्यानंतर तिचे आयुष्य उद्धवस्त करण्याचाही त्याने प्रयत्न केला.

पुढे त्याने तिचा नातेवाईक असलेल्या सागर याच्या खुनाचा कट रचला. त्यासाठी मित्र गौरव साके यास ५० हजारांची सुपारी दिली. एक दिवस सागरला पैशांची अडचण असल्याने त्याने आरोपी भापकरला सांगितले. त्याने नियोजित कटानुसार दि.१४ जानेवारी २०२२ रोजी रात्री त्याला चिखली घाटात बोलावले. तेथे घाटाच्या बाजूस असलेल्या फॉरेस्टमध्ये सागरला नेऊन त्यास जास्त प्रमाणात दारू पाजली. नंतर दोघे त्यास मोटारसायकलवर बसवून श्रीगोंदा तालुक्यातील मोहरवाडी गावाच्या शिवारात घेऊन गेले. रात्री ९.३० च्या सुमारास त्याला कुकडी कॅनॉलच्या पाण्यात फेकून दिले.दारू जास्त पिलेला असल्याने सागर याचा पाण्यात बुडून मृत्यू झाला व त्याचे प्रेत कॅनॉलच्या पाण्यात वाहून गेले. काही दिवसांपूर्वी बेलवंडी पोलिसांना कॅनॉलच्या पाण्यात एक पूर्णपणे कुजलेले प्रेत आढळून आले होते. मात्र, मयताची ओळख पटू शकलेली नव्हती. इकडे सागर झरेकरचा शोध त्याच्या घरच्यांना किंवा नगर तालुका पोलिसांना लागलेला नव्हता.

दरम्यानच्या काळात सागरच्या आई-वडिलांनी पोलिस अधीक्षक मनोज पाटील यांची भेट घेऊन सागरचा तपास लावण्याची विनंती केली. पोलिस अधीक्षक पाटील यांनी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक अनिल कटके यांना या प्रकरणाचा समांतर तपास करण्याच्या सूचना दिल्या. त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखेचे पथक तपास करत असताना पोलिस निरीक्षक कटके यांना एका खबऱ्याने आरोपी गौरव साके याने हा खून केला असल्याची माहिती दिली. या माहितीच्या आधारे पोलिसांच्या पथकाने साकेवाडी येथे जाऊन गौरव साके याला ताब्यात घेतले. त्याच्याकडे कसून चौकशी केल्यावर त्याने कबुली देत, त्याचा मित्र विश्वनाथ भापकर अशा दोघांनी हा खून केल्याचे सांगितले. त्यानंतर पोलिसांनी कोळगाव येथे जाऊन आरोपी भापकर याला ताब्यात घेतले. त्यानंतर दोघांकडून या फिल्मी स्टाईलने केलेल्या खुनाचा उलगडा झाला. शुक्रवारी (दि.२) रात्री याबाबत स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस अंमलदार सुनील चव्हाण यांनी नगर तालुका पोलिस ठाण्यात दिलेल्या फिर्यादीवरून विश्वनाथ ऊर्फ सुशांत सोपान भापकर व गौरव गोरक्ष साके यांच्या विरोधात भा.दं.वि. कलम ३०२, २०१,१२० (ब), ३४ अन्वये कट रचून खून केल्याचा गुन्हा दाखल केला. गुन्हा उघडकीस आणण्यासाठी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलिस निरीक्षक अनिल कटके, सहायक पोलिस निरीक्षक दिनकर मुंढे, गणेश इंगळे यांच्यासह पथकाने प्रयत्न केले. आरोपी विश्वनाथ भापकर हा सराईत गुन्हेगार असून, त्याच्याविरुद्ध खून, दुखापत करणे, महिला अत्याचार असे गंभीर स्वरूपाचे ४ गुन्हे बेलवंडी, श्रीगोंदा व नगर तालुका पोलिस ठाण्यात दाखल आहेत.

## मसाज सेंटरच्या नावाखाली वेश्याव्यवसाय

**दै. अधिकारनामा**

**पुणे :** नांदेड सिटी परिसरात मसाज सेंटरच्या नावाखाली सुरू असलेल्या वेश्या व्यवसायावर पुणे ग्रामीण पोलिसांच्या अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक विभागाने छापा टाकून कारवाई केली. या वेळी परदेशी तरुणीसह तिघींना ताब्यात घेण्यात आले. तर, मसाज सेंटरच्या मालक, मॅनेजरसह चौघांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मसाज सेंटर मालक मुंजा रामदास शिंदे (वय ३१, रा. वडगाव), योगेश पवार (रा. नांदेड गाव), मॅनेजर अथर्व प्रशांत उभे (वय १९, रा. धायरी, बेनकरवस्ती), ज्योती विपुल वाळिंबे ( वय ३०, रा. नऱ्हे) यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शिंदे, उभे आणि वाळिंबेला अटक करण्यात आली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार नांदेड सिटी परिसरात डेस्टिनेशन सेंटर मॉलमधील ब्लू बेरी स्पा सेंटरमध्ये मसाज सेंटरच्या नावाखाली वेश्याव्यवसाय सुरू असल्याची माहिती ग्रामीण पोलिसांच्या अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक विभागाला मिळाली. त्यानुसार पोलिसांनी बनावट ग्राहकाच्या माध्यमातून खातरजमा केली असता, वेश्याव्यवसाय सुरू असल्याचे समजले.




पोलीस अधीक्षक डॉ. अभिनव देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक विजयसिंह चौहान, पोलीस उपनिरीक्षक अभिजित सावंत, सुधीर घुले, महेश गायकवाड, जितेंद्र शेवाळे, हवालदार ज्योती बांभळे, पूनम कांबळे, सीमा जगताप यांनी मसाज सेंटरवर छापा टाकला. मसाज सेंटरमध्ये तरुणींना जादा पैशांचे आमिष दाखवून त्यांना वेश्याव्यवसायास प्रवृत्त केल्याचे निष्पन्न झाले आहे. या प्रकरणी अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंध कायद्र्यान्वये हवेली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. परदेशी तरुणीसह तिघींना ताब्यात घेण्यात आले. बनावट चावीच्या सहाय्याने घराचे कुलूप उघडून चोरट्यानी एका ज्येष्ठ महिलेच्या घरातून दोन लाख ९५ हजार रुपयांचे दागिने चोरी केल्याची घटना कात्रज परिसरात समोर आली आहे. याप्रकरणी एका ज्येष्ठ महिलेने भारती विद्र्यापीठ पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार अज्ञात चोरट्यांविरुद्ध घरफोडीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादी महिला बिबवेवाडीत राहायला असून, त्यांचे कात्रज भागातील शेलारमळा परिसरात घर आहे. घरातून ऐवज चोरीला गेल्याचे लक्षात आल्यानंतर महिलेने पोलिसांकडे तक्रार दिली. ज्येष्ठ महिलेच्या घरात चोरी करणारे चोरटे माहितगार असल्याचा संशय पोलिसांनी व्यक्त केला असून सहायक पोलिस निरीक्षक घावटे तपास करत आहेत.

वडगाव शेरी परिसरातील एका मेडिकलचे शटर उचकटून ड्रॉवरमध्ये ठेवलेली साठ हजार रुपयांची रोकड लंपास केली.याप्रकरणी जगदीश देवाशी यांनी चंदननगर पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार अज्ञात चोरट्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे; तसेच येथील आंबेडकर वसाहती शेजारील म्हाडा बिल्डिंगमध्ये असलेल्या शिवदत्त डेअरीचे शटर उचकटून चोरट्यांनी ६ हजारांची रोकड चोरी केली. याप्रकरणी विकास कात्रे यांनी फिर्याद दिली आहे. वारजे परिसरातील प्रथमेश अपार्टमेंट शिवणे येथील एका सदनिकेच्या खिडकीतून किचनमध्ये हात घालून चार्जिंगला लावलेला मोबाईल चोरट्यांनी उचलून नेला. प्रशांत क्षीरसागर यांनी याबाबत वारजे पोलिसात फिर्याद दिली आहे. ४४ लाख २० हजार ११८ रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी अमित देवराम कलाटे (वय ३२, रा. वाकड चौक) याला प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी एस. जे. डोलारे यांनी जामीन मंजूर केला आहे. त्याने ॲड. सुधीर शहा आणि ॲड. राहुल भरेकर यांच्यामर्फत जामिनासाठी अर्ज केला होता. १२ नोव्हेंबर २०१६ रोजी हा प्रकार घडला. प्लॉटिंग डेव्हलपमेंटमधील रस्त्याच्या कामाच्या बदल्यात ४४ लाख २० हजार ११८ रुपये रक्कम स्टॅमसह परत द्र्यायची होती. मात्र, आरोपीने त्याबदल्यात कासारसाई येथील साडेसहा गुंठे जागा देतो, असे सांगितले. प्रत्यक्षात जागा न देता फसवणूक केल्याचे फिर्यादित म्हटले आहे.

## हडपसरमध्ये नवीन कालव्यात विसर्जन नाही

**दै. अधिकारनामा**

**हडपसर :** कोरोना संकटानंतर या वर्षी निर्बंधविरहित गणेशोत्सव साजरा केला जात आहे. असे असले तरी नैसर्गिक विसर्जन स्थळांवर म्हणजे हडपसरमधून वाहणारा नवीन कालवा, तसेच मांजरी बुद्रुक येथील मुळा-मुठा नदीपात्र येथे नागरिकांनी थेट गणेश विसर्जन करू नये, असे आवाहन करण्यात आले आहे. महापालिकेच्या हडपसर क्षेत्रीय कार्यालयांतर्गत सुमारे ३६ ठिकाणी मूर्ती संकलनाची व्यवस्था करण्यात आली आहे. याशिवाय, १५ फिरते विसर्जन हौद यांची व्यवस्था महापालिकेकडून करण्यात आली आहे. नवीन कालवा आणि मांजरी बुद्रुक येथील मुळा- मुठा नदी ही या परिसरातील नैसर्गिक विसर्जन स्थळे आहेत. गेली अनेक वर्षे येथे नागरिक गणेश विसर्जन करीत होते. मात्र ,गेल्या वर्षी कोरोनाच्या



पार्श्वभूमीवर याठिकाणी गणेश विसर्जन न करण्याचे आवाहन करण्यात आले होते. याही वर्षी महापालिकेने येथे गणेश विसर्जन न करण्याचे आवाहन केले आहे. कालवा परिसर आणि नदीच्या काठावर असलेल्या विसर्जन घाटांवर बांबू, तसेच बॅरिकेट्स बांधण्यात येणार आहेत .त्यामुळे नागरिकांना त्यांच्या जवळ असलेल्या महापालिकेच्या मूर्ती संकलन केंद्रात गणेशमूर्ती द्र्यावी लागणार आहे. प्रत्येक प्रभागात किमान ७-८ मूर्ती संकलन केंद्रे सुरू केली आहेत.

प्रभाग क्रमांक २२,२३,२६ आणि ४२, तसेच नव्याने समाविष्ट करण्यात आलेल्या गावांत ३६ ठिकाणी मूर्ती संकलन केंद्र व निर्माल्य जमा करण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. याशिवाय, हडपसर – मुंढवा क्षेत्रीय कार्यालयाचे १५ फिरते हौद तयार असून, प्रत्येक आरोग्य कोठीकडून तो फिरण्याचे नियोजन करण्यात आले आहे. यासाठी ३६ मोबाईल टॉयलेट, १२ जीवरक्षक व २५१ स्वच्छता कर्मचारी व मदतनीस यांची गणेश विसर्जन व्यवस्थेसाठी नेमणूक करण्यात आली आहे.ग्रामपंचायत कार्यालय हांडेवाडी, ग्रामपंचायत कार्यालय होळकरवाडी, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा शेवाळेवाडी, ए. एम. कॉलेज महादेनगर, राम मंदिर मांजरी फार्म, पी.एम.आर.डी प्लॉट शेवाळेवाडी फाटा, ग्रामपंचायत कार्यालय मांजरी बुद्रुक, जिल्हा परिषद शाळा म्हसोबा वस्ती मांजरी बुद्रुक.

## गणेशोत्सवात जिवंत देखाव्याने डोळे पाणावले

**दै. अधिकारनामा**

**चिपळूण :** शहरातील महर्षी अण्णासाहेब कर्वे भाजी मंडई गणेशोत्सवाच्या निमित्ताने यावर्षी सामाजिक संदेश देणारा जिवंत मानवी देखावा उभारण्यात आला आहे. स्त्रीभ्रूणहत्या या ज्वलंत विषयावर समाजाला संदेश देण्यासाठी मंडळाने या विषयाची निवड केली असून 'बाबा, मला मारू नका' अशी आर्त हाक मातेच्या पोटातील गर्भ समाजाला घालत आहे. हा देखावा पाहण्यासाठी नागरिकांची गर्दी होत आहे. चिपळुणातील महर्षी अण्णासाहेब कर्वे भाजी मंडई गणेशोत्सव मंडळ गेली अनेक वर्ष धुमधडाक्यात गणेशोत्सव साजरा करीत असते. या गणेशोत्सवाचे वैशिष्ट्य म्हणजे येथे उभारण्यात येणारा देखावा हा कोकणात वैशिष्ट्यपूर्ण ठरतो. या मंडळाच्या वतीने



दरवर्षी पौराणिक, धार्मिक, ऐतिहासिक, सामाजिक अशा विविध विषयावर देखावे तयार केले जातात आणि गणेशोत्सवाच्या निमित्ताने एक संदेश दिला जातो. कोरोना महामारी आणि गेल्या वर्षी आलेला महापूर या पार्श्वभूमीवर गेले दोन वर्षे येथील गणेशोत्सव साजरा झालेल्या नाही. या वर्षी मात्र मंडळाच्या वतीने जिवंत मानवी देखावा सादर करण्यात आला आहे. सध्या स्त्रीभ्रूणहत्या हा ज्वलंत विषय आहे. वंशाला दिवा पाहिजे म्हणून अनेकांना आपल्याला मुलगाच व्हावा अशी अपेक्षा असते.

त्यासाठी देवधर्म, नवस, प्रसंगी अघोरी कृती देखील केली जातात आणि वंशाला दिवा हवा म्हणून प्रसंगी स्त्रीभ्रूणहत्या ही केली जाते. या ज्वलंत सामाजिक प्रश्नावर प्रकाशझोत टाकणारा हा जिवंत देखावा आहे. अलिकडे अनेक मुलांना लग्नासाठी मुली मिळण्याचा प्रश्न निर्माण झाले आहेत. त्यामुळे समाजात स्त्री आणि पुरुष जन्मदर यामध्ये मोठी तफावत निर्माण होत आहे. परिणामी भविष्यात मोठी सामाजिक समस्या निर्माण होण्याचा धोका आहे. हे लक्षात घेऊन मंडळाने हा विषय गणेशोत्सवाच्या निमित्ताने समाजासमोर आणला आहे. दररोज सकाळी अकरा ते दुपारी एक व सायंकाळी ७ ते रात्री नऊ या वेळात हा देखावा सुरू राहणार आहे. विशेष म्हणजे हा जिवंत मानवी देखावा असल्याने समोर एक घटना घडत असल्याचा भास होत असून लोकांना हा विषय भावला आहे. या जिवंत देखाव्याची निर्मिती व संकल्पना भरत गांगण यांची असून यामध्ये संगीता काटकर, अजय यादव, पूजा शिंदे, नाट्य कलाकार शिवाजी मालवणकर, अनंत शिगवण, आणि छोट्या मुलीच्या भूमिकेत परी शिरगावकर यांनी काम केले आहे.

## संपादकीय


## अग्रलेख : आनंदचे वारसदार!

बुद्धिबळाचा पट विस्तारत असताना, महिलांसाठी संधी कमी आणि म्हणून ७५ पैकी केवळ दोनच महिला, हे मात्र शोचनीय.. 'चेन्नईतले बुद्धिबळ ऑलिम्पियाड आजवर झालेल्यांपैकी सर्वाधिक सुनियोजित म्हटले पाहिजे', अशी सार्वत्रिक प्रतिक्रिया या स्पर्धेसाठी आलेले बहुतांश पाहुणे मायदेशी पोहोचल्यानंतर व्यक्त करतात, ही आपल्यासाठी समाधानकारक आणि अभिमानास्पद बाब. चेन्नईपासून काही अंतरावर असलेल्या मामल्लापुरम येथे ही स्पर्धा प्रत्यक्ष खेळवली गेली. त्यासाठी जगभरातून १८६ देशांचे १७०० खेळाडू, प्रशिक्षक, सहायक भारतात आले होते. ऑलिम्पियाड स्पर्धेचे आयोजन हे बहुविध खेळांच्या स्पर्धेप्रमाणेच आव्हानात्मक समजले जाते, कारण नियोजनाचा भार सहसा एका शहराच्या आणि राज्याच्या प्रशासनाला उचलावा लागतो. त्या आघाडीवर तमिळनाडूचे मुख्यमंत्री एम. के. स्टॅलिन आणि त्यांच्या प्रशासनाची कामगिरी खणखणीत होती. स्टॅलिन सरकारमधील अत्यंत वरिष्ठ नोकरशहा संयोजनकार्यासाठी तैनात होते. स्थानिक प्रशासन, कॉर्पोरेट विश्व, असंख्य प्रशिक्षित कार्यकर्ते असा फौजफाटा ही स्पर्धा यशस्वी करण्यासाठी निगुतीने राबला. माजी जगज्जेता आणि महान बुद्धिबळपटू विश्वनाथन आनंद हा तमिळनाडू किंवा चेन्नईचा आहे या वास्तवापाशी आत्मसंतुष्ट न राहता, त्याच्या देदीप्यमान कारकीर्दीला शोभेसे संयोजन चेन्नईने करून दाखवले. इतर सर्व शहरांसाठी आणि राज्य सरकारांसाठी त्यामुळेच हे ऑलिम्पियाड आदर्शवत ठरावे. या ऑलिम्पियाडची आणखी एक गंमत म्हणजे, मुळात ते चेन्नईत होणारच नव्हते. २०२० मध्ये ते रशियात होणार होते. त्या वेळी करोनामुळे ते लांबणीवर पडले आणि यंदाच्या वर्षी युक्रेनवर रशियाने हल्ला केल्यामुळे त्या देशाकडून यजमानपदच काढून घेण्यात आले. ऐन वेळी यजमानपद कोणाला द्यायचे याचे उत्तर भारतीय बुद्धिबळ संघटनेचे सचिव भारतसिंह चौहान यांनी दिले. ही स्पर्धा भारतात भरवून दाखवण्याचे आश्वासन त्यांनी दिले. भारतातून दिल्ली, गुजरात आणि तमिळनाडू या राज्यांनी रस दाखवला. त्यातही तमिळनाडूने १०० कोटी रुपयांची हमी तातडीने देऊन आणि असा तसा निधी तत्परतेने उभा करून बाजी मारली. हल्लीच क्रीडा प्रकल्प आणि स्पर्धांमध्ये नवोन्मेषी रुची निर्माण झालेल्या गुजरात राज्याने ही स्पर्धा भरवण्यासाठी जोर लावला होता. परंतु स्पर्धा भरवण्याचा अनुभव आणि पायाभूत सुविधा उभारण्यातली तत्परता या जोरावर तमिळनाडूने बाजी मारली. खेळाडूंच्या कामगिरीकडे वळण्यापूर्वी ही प्रस्तावना आवश्यक, कारण खेळातील यश हे निब्बळ खेळाडूंचे असत नाही. या स्पर्धेपूर्वी भारतात झालेली अशी बहुराष्ट्रीय स्पर्धा म्हणजे दिल्ली राष्ट्रकुल २०१०. त्याही स्पर्धेत भारतीय खेळाडूंनी ऐतिहासिक कामगिरी करून दाखवलीच होती. मात्र आजही ती स्पर्धा खेळाडूंच्या कामगिरीसाठी नव्हे, तर सुरेश कलमाडी प्रभृतींच्या घोटाळ्यांसाठीच कुपरिचित आहे. चेन्नई ऑलिम्पियाडच्या बाबतीत हे होणार नाही. किंबहुना, भारतीय बुद्धिबळपटूंच्या कामगिरीइतकीच ती उत्तम संयोजनासाठीही स्मरणात राहील. आता थोडेसे पटावरील भारतीयांच्या कामगिरीविषयी.

विश्वनाथन आनंदच्या उदयानंतर बुद्धिबळाच्या या जन्मभूमीत या खेळामध्ये थोड्या अवकाशानंतर अक्षरशः क्रांती झाली. सरत्या सहस्रकात भारतात आनंद, दिव्येंदु बारुआ आणि प्रवीण ठिपसे असे तीन ग्रँडमास्टर होते. यंदा स्वातंत्र्याच्या ७५व्या वर्षांत ही संख्या ७५वर पोहोचली आहे. आनंदचा उदय नव्वदच्या दशकातला, पण तो दिग्विजयी आणि जगज्जेता ठरू लागला नवीन सहस्रकाच्या पहिल्या दशकात. त्याच काळात बुद्धिबळाविषयी भारतीयांमध्ये अभूतपूर्व आकर्षण निर्माण होऊ लागले. या आवडीला आणि नैसर्गिक गुणवत्तेला उच्च दर्जाच्या प्रशिक्षणाची जोड मिळत गेली आणि त्याचे परिणाम आज दिसत आहेत. आतापर्यंतच्या ऑलिम्पियाडमध्ये आपल्याला क्वचितच पदके मिळत होती. यंदा तीच संख्या सातवर पोहोचली. डी. गुकेश आणि निहाल सरीन यांना वैयक्तिक सुवर्णपदक, अर्जुन एरिगेसी याला रौप्यपदक; तर आर. प्रज्ञानंद, त्याची बहीण आर. वैशाली, तान्या सचदेव आणि आपल्या नागपूरची दिव्या देशमुख यांना वैयक्तिक कांस्य पदक मिळाले. याशिवाय दोन सांघिक कांस्य पदके अशी ही कामगिरी सर्व संघांमध्ये सवोत्तम ठरली. यजमान देश म्हणून प्रत्येकी तीन संघ उतरवण्याची संधी भारताला मिळाली. यातही भारताच्या ब संघाने सर्वाधिक लक्ष वेधून घेतले. गुकेश, सरीन, प्रज्ञानंद, रौनक साधवानी हे या संघातील सदस्य वीस वर्षांखालील आहेत. त्यांनी अमेरिकेसारख्या बलाढ्य आणि अव्वल मानांकित संघाला ३-१ अशी धूळ चारली. भारतीय पुरुषांच्या वरिष्ठ संघालाही त्यांनी झाकोळले. गुकेश आणि वरिष्ठ संघाकडून खेळलेला अर्जुन एरिगेसी (हाही तसा युवाच) बुद्धिबळात प्रस्थापित मानल्या जाणाऱ्या एलो मानांकनामध्ये २७०० गुणांच्या वर पोहोचले आहेत. गुकेश आता आनंदनंतर दुसऱ्या क्रमाकांचा भारतीय बुद्धिबळपटू बनला असून, त्याने क्रमवारीत पेंटाल्या हरिकृष्ण आणि विदित गुजराथी यांना मागे टाकले आहे. महिलांमध्ये कोनेरु हम्पीच्या नेतृत्वाखाली भारताने मिळवलेले कांस्य पदकही कौतुकास्पदच. हम्पी आणि हरिका द्रोणवल्ली या ग्रँडमास्टर हा सवोच्च किताब मिळालेल्या भारतातील दोनच बुद्धिबळपटू आहेत. ही संख्या वाढवावी लागेल आणि त्यासाठी सर्वांगीण प्रयत्नांची गरज आहे. पुरुषांमध्ये ७३ ग्रँडमास्टर आणि महिलांमध्ये २ ग्रँडमास्टर इतकी दरी या दोहोंतील दर्जामध्ये खचितच नाही. परंतु जगभरातच महिलांसाठीच्या स्पर्धा फार होत नाहीत आणि या नियमाला भारत अपवाद ठरू शकतो. ऑलिम्पियाडमध्ये यापूर्वी अनेकदा पुरुषांपेक्षा महिलांची कामगिरी चांगली झाली होती. हम्पी, हरिका, तान्या सचदेव यांच्याबरोबरच आर. वैशाली, भक्ती कुलकर्णी, दिव्या देशमुख अशा अनेक उदयोन्मुख गुणवान बुद्धिबळपटू भारतात आहेत. त्यांच्यासाठी भारतात वरिष्ठ पातळीवरील, उच्च मानांकित स्पर्धा अधिकाधिक भरवल्या जाण्याची गरज आहे. टाटा स्टील स्पर्धेच्या निमित्ताने यंदा त्याची सुरुवात होईल हे कौतुकास्पद असले, तरी इतर समूहांनीही यात लक्ष घालण्याची गरज आहे. महिला सक्षमीकरण हे तत्त्व निब्बळ घोषणांपुरते मर्यादित न राहता, भारताच्या सक्षम महिला बुद्धिबळपटूंना सातत्याने पाठबळ देत राहिले पाहिजे. चीन, रशिया आणि अमेरिका यांच्या तोडीच्या स्पर्धा याही देशात व्हायला पाहिजेत. भारतात इतर अनेक खेळांमध्ये प्रगतीसाठी आजही परदेशी प्रशिक्षक हा महत्त्वाचा घटक असताना, बुद्धिबळात मात्र देशी प्रशिक्षकांनी उत्तम कामगिरी करून दिलासा दिला. महिला संघाचे प्रशिक्षक अभिजित कुंटे आणि पुरुष ब संघाचे प्रशिक्षक आर. बी. रमेश हे दोघे एके काळचे उत्कृष्ट ग्रँडमास्टर. आज दोघेही तितकेच चांगले प्रशिक्षक आहेत आणि सातत्याने भारतीय संघांना मार्गदर्शन करत आहेत. यानिमित्ताने या स्पर्धेत विजयी ठरलेल्या उझबेकिस्तान आणि युक्रेनचाही आवर्जून उल्लेख करावा लागेल. उझबेकिस्तान खुल्या गटात तर युक्रेन महिला गटात अजिंक्य ठरले. भारताच्या ब संघाप्रमाणेच, किंबहुना त्याहीपेक्षा अधिक युवा बुद्धिबळपटूंचा भरणा उझबेकिस्तानच्या संघात होता. रशिया, अमेरिका, चीन, भारत यांच्याप्रमाणेच या देशातही बुद्धिबळ महासत्ता बनण्याची क्षमता आहे हे दिसून आले. महिलांमध्ये युक्रेनचे अजिंक्यपद तर अधिक उल्लेखनीय. युद्धजर्जर अशा युक्रेनमध्ये अनेक शहरे उद्ध्वस्त झालेली आहेत. या परिस्थितीतही युक्रेनच्या महिला संघाने उत्तम तयारी केली आणि पटावरील प्रत्येक आव्हानाला त्या धीरोदात्तपणे सामोऱ्या गेल्या. या संस्मरणीय कामगिरीला धुमारे फुटले पाहिजेत. विश्वनाथन आनंद आता आंतरराष्ट्रीय बुद्धिबळ महासंघाचा (फिडे) उपाध्यक्ष बनला असून, प्रत्यक्ष खेळाऐवजी प्रशासकाच्या भूमिकेतून अधिक दिसू लागला आहे. याच भूमिकेतून भारताकडे अधिकाधिक दर्जेदार स्पर्धा आणण्यास तो प्राधान्य देईल, हे नक्की. विश्वनाथन आनंदसारखा दुसरा किंवा दुसरी कोणी होणे नाही. पण आनंदचे वारसदार मोठ्या संख्येने निर्माण होऊ लागले आहेत, हेही स्वागतार्हच!

# विकासाचा 'हा' दर काय सांगतो?

महासाथीसारखी परिस्थिती असो किंवा नसो, शेतकरी आणि शेतमजुरांना जगण्यासाठी त्यांच्या शेतात कष्ट करण्याशिवाय पर्याय नाही. पण रोजगाराच्या बाजारात सगळ्यात अकुशल तेच ठरतात. आर्थिक विकास होतो आहे, असे सरसकटपणे म्हणताना आपण हा वर्ग लक्षात घेतच नाही. राष्ट्रीय सांख्यिकी आयोगाने गेल्या बुधवारी २०२२-२३ च्या पहिल्या तिमाही (एप्रिल-जून) साठी सकल राष्ट्रीय उत्पादनाबाबतचा आपला अंदाज मांडला होता. त्यातली प्रमुख आकडेवारी होती विकास दराची. त्याबाबत त्यांचा अंदाज १३.५ टक्के होता. सकल वर्धित मूल्या ( ग्रॉस व्हॅल्यू अ‍ॅडेड -) च्या दृष्टीने ही संख्या १२.७ टक्के आहे. रेटिंग एजन्सी, बँका आणि आरबीआयचे अंदाज १३ ते १६.२ टक्क्यांपर्यंत आहेत हे लक्षात घेता, त्या मर्यादेत येणारी कोणतीही संख्या, मला वाटते, स्वतःच स्वतःची वाहवा करून घेण्यासारखी आहे. तथापि, आकडेवारीच्या पलीकडे एक मोठे जग आहे. हा लेख वास्तव जगात राहणाऱ्या लाखो लोकांच्या आयुष्याच्या संदर्भात राष्ट्रीय सांख्यिकी आयोगाच्या आकडेवारीचा अर्थ काय असतो आणि या आकडेवारीमुळे कोण सुखावेल आणि कोण नाही, याविषयी आहे. मी २०१९-२० आणि २०२१-२२ साठी संबंधित आकडे असलेला तक्ता तयार केला आहे आणि २०२२-२३ च्या पहिल्या तिमाहीसाठी आकडे जोडले आहेत. (कृपया सोबत दिलेला तक्ता पहावा.) २०२०-२१ या करोनाच्या महासाथीच्या वर्षांत दीर्घकाळ टाळेबंदी होती. मी त्या वर्षांच्या आकडेवारीचा तक्त्यामध्ये समावेश केलेला नाही. मी सांगू शकतो की, २०१९-२० हे नेहमीसारखे सामान्य वर्ष होते. २०२१-२२ या वर्षाकडे परिस्थिती पूर्वपदावर येण्याचे वर्ष म्हणून पाहिले गेले. २०२२-२३ या वर्षांमध्ये परिस्थितीचा गाडा पूर्णपणे पूर्वपदावर येणे अपेक्षित होते. म्हणून, २०१९-२०, २०२१-२२ आणि २०२२-२३ या वर्षांमधल्या आकडेवारीवर लक्ष केंद्रित केले पाहिजे.



शिवाय, एखाद्या क्षेत्राच्या कामगिरीचा ज्या लोकांच्या जीवनावर परिणाम होतो, त्यांच्या दृष्टिकोनातून या आकडेवारीकडे पाहिले पाहिजे. उदाहरणार्थ, 'शेती, वनीकरण आणि मत्स्यव्यवसाय' हे क्षेत्र देशातील बहुतांश कुटुंबांच्या जीवनावर परिणाम करते. 'खाणकाम तसेच उत्खनन' आणि 'बांधकाम' ही क्षेत्रे महत्त्वाची आहेत. कारण या दोन्ही क्षेत्रांमध्ये कमी कौशल्ये आणि कमी शिक्षण असलेल्या कामगारांची संख्या जास्त आहे. वित्त, स्थावर जंगम (रिअल इस्टेट) आणि व्यावसायिक सेवा महत्त्वाच्या आहेत. कारण त्यात शिक्षित, विशिष्ट कौशल्य असलेले आणि पांढरपेशी लोक काम करतात. सुरुवात २०१९-२० पासून करू. विकसित होत असलेल्या देशाची आर्थिक वाढ मागील वर्षांच्या आणि सुरुवात केली त्या वर्षापेक्षा अधिक वेगाने झाली पाहिजे. सकल वर्धित मूल्याच्या आकडेवारीवरून हे स्पष्ट होते की, २०२०-२१ च्या महासाथीच्या काळातील वाईट परिस्थितीमधून अर्थव्यवस्था २०२१-२२ मध्ये सावरली, परंतु कृषी क्षेत्र वगळता वेगवेगळ्या क्षेत्रांमधील वाढ २०१९-२० मध्ये म्हणजे करोनाच्या आधी होती त्या उत्पादनाच्या पातळीवर पोहोचली नाही. यातून शिकण्यासारखा एक महत्त्वाचा धडा आहे. तो म्हणजे महासाथीसारखी परिस्थिती असो किंवा नसो, शेतकरी आणि शेतमजुरांना जगण्यासाठी त्यांच्या शेतात कष्ट करण्याशिवाय पर्याय नाही. त्यांच्याकडे घरून काम करण्याची चैन असत नाही! ('वित्त वगैरे' क्षेत्रामधील किरकोळ वाढ नगण्य होती.)

म्हणून, २०२२-२३ मध्ये आपल्याला जी वाढ अपेक्षित आहे ती २०२१-२२ ची वाढ नसून २०१९-२० ची आहे. तक्त्याच्या शेवटच्या दोन ओळी यातला फरक अधोरेखित करतात. मागील वर्षांच्या (२०२१-२२) पहिल्या तिमाहीच्या तुलनेत २०२२-२३ च्या पहिल्या तिमाहीमधील वाढ प्रभावी असताना, २०१९-२० च्या पहिल्या तिमाहीच्या तुलनेत ती चिंताजनक आहे. 'कृषी वगैरे'ची वाढ नेहमीसारखी राहिल्याचे दिसते. वित्त, स्थावर जंगम या क्षेत्रांची वाढ उत्साहवर्धक आहे, परंतु तक्त्यातील इतर तीन क्षेत्रे मात्र अर्थव्यवस्था अजूनही तळ्यात मळ्यात असल्याचे दाखवतात. मी त्या तक्त्यात 'उत्पादन' या क्षेत्राचा समावेश केला नाही. कारण मला त्याच्याशी संबंधित आकडे या आकड्यांच्या जंगलात हरवू द्यायचे नव्हते. तीन वर्षांच्या प्रत्येकी पहिल्या तिमाहीत 'उत्पादन' क्षेत्राने पुढीलप्रमाणे मूल्यवर्धन केले : ५६५, ५२६, ५७७, २४९ आणि ६०५,१०४ कोटी रुपये. वाढीच्या बाबतीत, २०२२-२३ च्या पहिल्या तिमाहीत २०१९-२० च्या तुलनेत सात टक्के आणि २०२१-२२ च्या तुलनेत ४.८ टक्के वाढ नोंदवली गेली. अपुरी नवीन गुंतवणूक किंवा कमी मागणी किंवा दोन्हीमुळे उत्पादनवाढ अजूनही संथ आहे. सूक्ष्म, लघु तसेच मध्यम उद्योगांच्या क्षेत्रात अजूनही मंदीच आहे, असे मला वाटते. भविष्यात, विशेषतः रोजगाराच्या क्षेत्रावर काय परिणाम होतील हा महत्त्वाचा प्रश्न आहे. शेतकरी आणि शेतमजुरांची परिस्थिती तशीच राहील आणि बिगरशेती क्षेत्रातील रोजगारामध्ये थोडाफार फरक पडेल. पुन्हा नव्याने सुरुवात होत नाही तोपर्यंत अकुशल आणि कमी-कुशल कामगारांमध्ये बेरोजगारीचे प्रमाण जास्त असेल. फक्त 'खाणकाम इ.' आणि 'बांधकाम' या क्षेत्रांची परिस्थिती २०१९-२० च्या तुलनेत काही प्रमाणात बरी असेल. उत्पादनाला चालना देण्यासाठी सरकारने उचललेली पावले अपुरी आहेत हे तर स्पष्ट आहे. सूक्ष्म, लघु तसेच मध्यम उद्योगांच्या क्षेत्राचे पुनरुज्जीवन करण्यात सरकार अयशस्वी ठरले आहे. कुशल, पांढरपेशी नोकऱ्यांमधील संधी वाढत आहेत; परंतु सेवा क्षेत्राचा एक मोठा भाग (व्यापार, हॉटेल्स इत्यादी) अद्याप पुनरुज्जीवित होऊ शकला नाही, त्यामुळे नोकरीच्या संधी कमी झाल्या आहेत. (टीप : ऑगस्टमध्ये बेरोजगारीचा दर ८.३ टक्के झाला.) रिझर्व्ह बँकेने २०२२-२३ साठी तिमाहीनुसार १६.२, ६.२, ४.१ आणि ४.० टक्के असा वाढीचा अंदाज वर्तवला होता. लक्षात घ्या की, हा उतरता आलेख आहे. पहिल्या तिमाहीची सुरुवात १३.५ टक्क्यांनी झाली. ती रिझर्व्ह बँकेच्या अंदाजापेक्षा कमी होती. ही संथ सुरुवात उरलेल्या तीन तिमाहींबद्दल काय सांगते?

# शिक्षक उच्च स्थानीच

विद्यादान हे महत्त्वाचं दान आहे. म्हणून शिक्षक किंवा गुरूला समाजात आदराचं आणि उच्च स्थान दिलं जातं. लोकशाहीप्रधान असलेल्या आपल्या देशात राष्ट्रपतिपद हे घटनात्मकदृष्ट्या सर्वोच्च मानले जाते. या पदावर शिक्षकी पेशातील सर्वात प्रथम डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन हे विराजमान झाले. त्यांच्यानंतर तब्बल ५५ वर्षांनी शिक्षकी पेशातील द्रौपदी मुर्मु यांची राष्ट्रपतिपदी निवड झाली आहे. या सर्वोच्च पदी शिक्षकांना बसविल्याने विद्यादानाचा खरा सन्मान झाला आहे. एका गरीब कुटुंबातील एक हुशार मुलगा दहावीची परीक्षा देतो. परीक्षेचा उद्या निकाल असताना त्या मुलाची आई चिंतेत होती. अक्षरशः ती रडत होती. त्या मुलाने आईला विचारले, 'आई का रडते.' तेव्हा ती म्हणाली, 'बाळा, उद्या तुझा दहावीच्या परीक्षेचा निकाल आहे. तू पास होणार याबद्दल मला शंका नाही. पण तू पास झालास तर तुला मी पुढे कशी शिकवू याची मला चिंता आहे. माझ्याकडे तुझ्या पुढील शिक्षणासाठी पैसे नाहीत.' तेव्हा त्या मुलाने आईचे डोळे पुसले आणि म्हणाला, 'आई, तू काळजी करू नकोस, मी नुसता पास होणार नाही तर, पहिल्या क्रमांकाने उत्तीर्ण होणार आहे. त्यामुळे मला बक्षीस मिळणार आहे. आणि ते पैसे मला शिक्षणासाठी पुरेसे आहेत.' ते ऐकून आईला काहीसा दिलासा मिळाला असला तरी प्रत्यक्ष निकाल लागून बक्षीस मिळेपर्यंत तिच्या मनावरचे दडपण कमी झाले नव्हते. खरोखरच तो मुलगा पहिल्या क्रमांकाने उत्तीर्ण झाला आणि त्याला बक्षीसही मिळाले तेव्हा आईला स्वर्ग दोन बोटे उरला होता. तिने मुलाला उराशी कवटाळले. मुलाच्या बुद्धिमत्तेचा आणि आत्मविश्वासाचा तिला विलक्षण अभिमान वाटला. या मुलाचे नाव होते डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन.

डॉ. राधाकृष्णन हे उच्चविद्याविभूषित होतेच पण त्यांनी शिक्षकी पेशाला वाहून घेतलेले होते. अत्यंत सामान्य गरीब कुटुंबात जन्मलेल्या शिक्षणासाठी पुरेसा पैसा नसतानाही डॉ. सर्वपल्ली यांनी शिक्षण क्षेत्रात आणि त्यानंतर राजकारणात घेतलेली झेप निश्चितच असामान्य अशीच आहे. देशातील विविध विद्यापीठांसोबतच ऑक्सफर्ड विद्यापीठात त्यांनी विद्यादान केले. बनारस विश्वविद्यापीठाचे कुलगुरू म्हणूनही त्यांनी जबाबदारी सांभाळली. देशाचे पहिले उपराष्ट्रपती होण्याचा मान त्यांनी मिळविला. १९५२ ते १९६२ या काळात ते देशाचे उपराष्ट्रपती होते. तर १९६२ ते १९६७ या काळात ते देशाचे राष्ट्रपती होते. १९६२ साली डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन हे राष्ट्रपती झाले असताना त्यांच्या वाढदिवसानिमित्त शुभेच्छा देण्यासाठी काही मित्र आले होते. त्यावेळी त्यांनी आज माझा जन्मदिवस असला तरी केवळ माझा वाढदिवस साजरा न करता सर्व शिक्षकांप्रति आदर व्यक्त करण्यासाठी शिक्षकांचा सन्मान करावा, अशी कल्पना खुद्द डॉ. राधाकृष्णन यांनी मांडली. आणि तेव्हापासून या महान विद्वान तत्त्ववेत्त्याचा जन्मदिवस हा 'शिक्षक दिन' म्हणून पाळला जातो. डॉ. राधाकृष्णन यांच्यानंतर तब्बल ५५ वर्षांनी पुन्हा शिक्षकी पेशातील आदिवासी सर्वसामान्य कुटुंबातील महिलेला तो सन्मान मिळाला आहे. ओडिशामधील आदिवासीबहुल मयूरभंज जिल्ह्यातील सामान्य कुटुंबातील शिक्षकी पेशातील द्रौपदी मुर्मु या राष्ट्रपतिपदी विराजमान झाल्या आहेत. त्या देशाच्या १५व्या आणि शिक्षकी पेशातील दुसऱ्या राष्ट्रपती आहेत. प्रारंभी शिक्षकी पेशात असलेल्या मुर्मू यांनी काही काळ ओडिशा सरकारच्या पाटबंधारे खात्यात नोकरी केली. २००४ साली आमदार झालेल्या द्रौपदी मुर्मु यांना २००९ पर्यंत स्वतःच्या मालकीचे घरही नव्हते. २०१५ मध्ये त्या झारखंडच्या पहिल्या महिला राज्यपाल झाल्या. त्यानंतर राष्ट्रपती भवनामध्ये जाईपर्यंत त्या आपल्या रायरंगपूर गावीच वास्तव्याला होत्या.

# आडनाव सार्थ करणारे संत सर...

गांधी चष्म्याची फ्रेम जर थोडी मॉडिफाय केली, वेगळ्या शब्दांत सांगायचं तर गांधी चष्म्याची फ्रेम खालच्या बाजूने थोडी ओढली की जो आकार तयार होईल साधारण त्या आकाराचा चष्मा. चेहऱ्याच्या रंगात मिसळून जाईल अशी काळसर लाल रंगाची फ्रेम आणि आधीच मोठ्या असणाऱ्या डोळ्यांना जास्तच मोठं करतील अशा भिंगांच्या काचा. चेहऱ्यावर सदैव मिश्कील भाव. कपड्यांचा मूळ रंग सांगता येणार नाही असा बुशकोट. तळ हरवलेल्या सुीपरवजा चपला. या सगळ्यामुळे हजारांतही ओळखता यईल असे हे रूप म्हणजे आमचे संत सर. अर्थात प्रभाकर संत. पण त्याहूनही वयाच्या नव्वदीतही तरुणालाही लाजवेल अशी उमेद, जबरदस्त धावपळ, कामाचा विलक्षण ध्यास. खाण्याचे कसलेच चोचले नाहीत. "शहाणे करीन सकळालाङ्क या व्रताने झपाटलेल्या या विद्वानाला सर्व महाराष्ट्र हा कल्याण-डोंबिवलीमधल्या अंतराइतका वाटत असावा. त्यामुळे अवघा महाराष्ट्र अनेकदा पालथा घातला. त्यांच्या पायात चपला नसून भिंगऱ्या लावल्या आहेत की काय असं वाटावं इतका प्रचंड प्रवास अख्ख्या महाराष्ट्रभर त्यांनी अनेकदा केला असेल. आज एखादा नगरसेवकही मोठ्या गाडीत दिसला नाही तर त्याच्या प्रतिष्ठेला फाऊल होतो. संत सर तर अतिशय चांगला लौकिक असणारे माजी आमदार, पण प्रवास मात्र सदैव भारतीय रेल्वे किंवा आपल्या एसटीच्या लाल डब्यातूनच. कोणताही कार्यक्रम, भाषण आणि भेटींच्या वेळा पाळण्याचा शिरस्ता नक्कीच होता. त्यासाठीच्या प्रवासाला मात्र वेळ आणि काळाची कोणतीही बंधनं त्यांना कधीच मानवत नव्हती.




संत सर म्हणजे आपलं आडनाव सर्वार्थाने सार्थ करणारे एक अवलिया होते. शिक्षण क्षेत्रात त्यांची कर्तबगारी अतुलनीय अशीच होती. पण त्याचबरोबर सामाजिक क्षेत्रातील अनेक कामं, राजकारण, साहित्य अगदी महाराष्ट्राचे आर्थिक नियोजन अशा असंख्य विषयात त्यांना प्रचंड गती होती. विविध विषयांतील अभ्यासही दांडगा होता, वाचन अफाट होतं. सामाजिक आणि राजकीय व्यक्तिमत्त्वांच्या चेहऱ्यावर दिसणाऱ्या आणि चेहऱ्यामागे दडलेल्या अनेक गुणावगुणांचा अभ्यास हाही एक विशेष त्यांच्यापाशी होता. सध्या प्रचलित मराठीत ज्याला 'सेन्स ऑफ ह्युमर' असं म्हणतात ती विनोदबुद्धी आणि विनोदाची जाण संत सरांकडे भरभरून होती. आताशा राजकीय पटलावर तर सेन्स ऑफ ह्युमरमधल्या सेन्सलाच ऑफ करून रिव्हेंज ऑफ ह्युमर घडताना गेल्या काही वर्षांत आपण महाराष्ट्रातही अनुभवलंय. कोणतीही गोष्ट करताना "लोक काय म्हणतील" हा सर्वसामान्यांचा विचार असतो आणि "लोकांनी काय म्हणावंङ्क असा विचार करणाऱ्या माणसांमध्ये असामान्यत्व दडलेलं असतं. अशा माणसांच्या जगण्याच्या संकल्पनाच वेगळ्या असतात. वैयक्तिक हौशी मौजी त्यांच्या या व्रताच्या, त्यांनी अंगीकारलेल्या कार्याच्या आड येऊ शकत नाहीत. संत सरांच्या फाटक्या चपलेच्या आणि कर्दमलेल्या कपड्यांच्या आत समाजातल्या तरुणाईला शिक्षणाने सुजाण करण्याचं झपाटलेपण दडलेलं होतं. खरंतर आमदारकीचं पेन्शन होतं, शिक्षक म्हणून निवृत्तिवेतनही असावं. म्हटलं तर महिन्याला एकच काय चार चार नवीन जोड आणि हवे तसे आणि हवे तेव्हा झकपक कपडे मिरवता आलेही असते, पण आपल्या पेन्शनचे पूर्ण पैसे नितांत गरज असणाऱ्या शैक्षणिक संस्थांसाठी आणि तिथल्या गरजू विद्यार्थ्यांसाठी नियमितपणे अर्पण करणाऱ्या माणसाचं असं झपाटलेपण कळायला समाजाला नेहमीच उशीर होत असतो. आपल्या चपलेहूनही त्या विद्यार्थ्यांचं चालणं सुसह्य व्हावं, त्या पैशातून त्या शिक्षण संस्थांचं चालणं गतिमान व्हावं असा विचार करणारी मुळातच कमी असतात आणि अशी प्रत्यक्ष कृती अव्याहतपणे करणारी माणसं तर फारच दुर्मीळ असतात. यालाच संतांचं लक्षण असं म्हणतात. हे संतांचं लक्षण संत सरांनी आयुष्यभर व्रतस्थपणे अंगीकारलं होतं. यामुळेच शिक्षण, सामाजिक आणि साहित्य विश्वातील अनेक संस्थांचे ते आधारस्तंभ आणि मार्गदर्शक होते. विद्यादानाचं कार्य करणारी, पेशाने शिक्षक असणारी आणि शिक्षण क्षेत्रात कार्यरत असणारी मंडळी आयुष्यभर गुरुवर्य, सर किंवा शिक्षक म्हणूनच उल्लेखली किंवा नावाजली जायची. पण आता ती जागा 'सम्राट' या शब्दाने घेतली. शिक्षणसम्राट असा उल्लेख फ्लेक्सवर नसला तर या क्षेत्रातील मंडळींना चालत नाही. साहजिकच आहे म्हणा, पेड सीट्समधून येणारा पैशाचा ओघ आणि त्याच पैशाच्या जोरावर सत्तेकडे जाण्याचा मिळालेला हा जवळचा मार्ग. 'मात्र संत सर हे अखेरपर्यंत संत सरच राहिले, शिक्षणसम्राट झाले नाहीत हे महाराष्ट्रातील हजारो विद्यार्थ्यांचे आणि शेकडो शिक्षण संस्थांचे भाग्य. संघाच्या विचारातून आणि संघ संस्कारातून अशी लखलखती असंख्य रत्न या मातृभूमीसाठी आपली आयुष्य वेचीत आली आहेत. १९५० ते ६० या दशकात माधवराव काणे, भगवानराव जोशी, माजी राज्यपाल रामभाऊ कापसे, आबासाहेब कान्हेरे, वामनराव साठे, संत सर, गोपाळराव टोकेकर आणि काही सहकारी आदी त्या वेळच्या तरुण मंडळींनी कल्याणमध्ये मुखर्जी हॉलची स्थापना केली. गम्मत म्हणजे मुरलीधर आळीमधील माधवराव काणे यांच्या वाड्यातील ओटीवरच्या एका छोट्याशा खोलीचं मुखर्जी हॉल असं नामकरण केले गेलं होतं. थोडक्यात "फडताळात बसून चिंता करतो विश्वाची" असाच काहीसा प्रकार होता. आश्चर्य म्हणजे याच मुखर्जी हॉलच्या सभासद मंडळींनी त्या नंतरच्या ३० वर्षांत ठाणे जिल्ह्यात म्हणजे आताच्या ठाणे आणि पालघर जिल्ह्यात सामाजिक, सांस्कृतिक आणि राजकीय जीवनावर अक्षरशः अधिराज्य गाजवलं. 'संघाचं कार्य' या मूळ प्रेरणेतून सुरू झालेला हा सारा प्रवास जवळपास सहा दशकांहूनही अधिक काळ अव्याहत सुरू आहे.

# नात्यांना नख लावणाऱ्यांना सुबुद्धी दे बाप्पा!

अलीकडील काळात कौटुंबिक कलहांचे प्रमाण वाढले असून, नातेसंबंधांमधील वाद विकोपाला जाताना दिसत आहेत. याच कारणातून होणाऱ्या आत्महत्यांचे प्रमाणही मोठे आहे, म्हणूनच माणुसकीच्या व नात्यांच्या जपणुकीची बुद्धी द्यावी, अशी विनवणी बाप्पा गणरायाकडे करू या. नातेसंबंधांना जपणं हे आजकाल खूप जिकिरीचं झालं आहे, कारण प्रत्येकाचंच मी व माझ्यातलं अडकलेपण वाढलं आहे. स्वार्थात नाती तोलली जाऊ लागल्यानं ती तुटण्याचं किंवा डागाळली जाण्याचंही भान बाळगलं जात नाही. परिणामी, समाजमनाला सुन्न करून जाणाऱ्या काही अप्रिय घटना रक्ताच्या नातेसंबंधात घडून येताना दिसतात. अलीकडे स्वार्थांधता वाढल्याने या घटनाही वाढल्या असून, नात्यांच्या जपणुकीसाठी बाप्पा गणरायालाच साकडे घालण्याची वेळ आली आहे. नातेसंबंधांबाबत प्रश्न उपस्थित व्हावेत अशा घटना अलीकडे वाढल्या आहेत. शेती नावावर करून देण्याच्या कारणावरून दोन दिवसांपूर्वी मुलानेच आईला विष पाजल्याचा प्रकार बुलडाणा जिल्ह्यातील नांदुरा तालुक्यात घडला. अवघ्या साडेतीन वर्षांच्या पोटच्या मुलीवर तिच्याच पित्याने लैंगिक अत्याचार केल्याची लज्जास्पद घटना नागपुरातील हुडकेश्वर पोलीस ठाण्यात नोंदली गेली. अनैतिक संबंधातून जन्मास आलेल्या पोटच्या गोळ्याला कचराकुंडीत फेकून देण्याच्या घटनाही अधूनमधून समोर येत असतात. अशा अन्यही अनेक घटनांची यादी वाढवता येईल, ज्यातून नातेसंबंधातील आदर, विश्वास व मर्यादांचाही गळाच घोटलेला दिसून येईल. का होत चालले आहे हे अधःपतन, असा प्रश्न त्यामुळेच निर्माण होतो.

सोशल मीडियाच्या वाढत्या वापरातून माणूस सोशल होतो आहे, असे मारे उच्चरवाने सांगितले जाते. पण, तसे होताना संस्काराचे घडे का पालथे होताना दिसतात? माणसाने माणसाशी माणुसकीनेच वागायला हवे. मात्र, कधी कधी तो कुटुंबातच नातेसंबंधातील आप्तांशीही पशुत्वाने वागताना दिसतो; त्यामुळेच 'नरेची केला किती हीन नर' असा प्रश्न उपस्थित होऊन जातो. म्हणायला अशी उदाहरणे ही अपवादात्मकच घडतात, परंतु संपूर्ण समाज मनाला ती अस्वस्थ करून सोडतात आणि तितकेच नव्हेतर, परस्परातील नात्यांना नख लावणारीही ठरतात. दुसऱ्यांकडून होणारी अवहेलना किंवा छळवणूक एकवेळ सहन केली जाऊ शकते; पण स्वकीयांकडून तसे घडले तर तो घाव अधिक वेदना देऊन जातो. दुर्दैवाने अशा वेदना जेव्हा वाट्यास येतात तेव्हा व्यक्ती कोलमडून पडल्याखेरीज राहत नाही. हे कोलमडलेपण व्यक्तीला निराशेच्या गर्तेत तर ढकलतेच; शिवाय आत्महत्येच्या अविवेकी विचारापर्यंतही पोहोचविते. राष्ट्रीय गुन्हे रेकॉर्ड ब्युरोने देशातील आत्महत्यांची जी आकडेवारी व त्याची कारणे दिली आहेत त्यात सर्वाधिक म्हणजे ३३.२ टक्के आत्महत्या कौटुंबिक समस्येतून घडून आल्याचे म्हटले आहे, यावरूनही नातेसंबंधातील नाराजी व दुराव्याचे वाढते प्रमाण किती भयग्रस्त होत चालले आहे हे लक्षात यावे. गणरायाच्या आगमनाने सध्या सारे वातावरण भारावले आहे. चैतन्याचा व मांगल्याचा उत्सव सुरू आहे. बुद्धिदाता देवता म्हणून गणरायांना पूजले जाते. संकट, विघ्न, दुःखाचे हरण करून सुख-समृद्धीची प्रार्थना विनायकाकडे केली जात आहे. ती करतानाच माणुसकीची परीक्षा पाहणाऱ्या व नात्यांना नख लावणाऱ्यांना सुबुद्धी दे बाप्पा, अशीही प्रार्थना करू या; इतकेच यानिमित्ताने.

दैनिक
अधिकारनामा

महाराष्ट्र माझा

* अकोला, सोमवार
दि. ०५ सप्टेंबर २०२२



## थोडक्यात

# बीपी व डायबेटिस जनजागृती मोहीम



**हिरा आसलकर**

**मलकापूर :** राजमाता जिजाऊ गणेशोत्सव मंडळ व जागर मल्टीपर्पज फाउंडेशन च्या वतीने नळगंगा नगर मलकापूर ग्रामीण येथे बीपी व डायबेटिस कॅम्प आज आयोजित करण्यात आले होते. या मोहिमेमध्ये ज्येष्ठ नागरिक व ६५ वर्षावरील नागरिकाचे मोफत बीपी व शुगर तपासण्यात आली या वेळी मलकापूर ग्रामीण भागातील नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला या जनजागृती मोहीमेत एकूण ९६ नागरिकांनी आपली तपासणी करून घेतली या वेळी जागर मल्टीपर्पज फाउंडेशन चे अध्यक्ष डॉ. नितीन बऱ्हाटे, विजय राणे, सुधीर पाटील, नाना नारखेडे, घनश्याम वराडे व मंडळाच्या वतीने सूर्यकांत उंबरकार,कुणाल नारखेडे, शरद ठोसर, विक्रम राणे, विनय पाटील, रोहन नारखेडे, संकेत खराटे, योगेश माळी, रोशन ठाकूर, गणेश वराडे, नितीकेश खोडके आदी राजमाता गणेशोत्सव मंडळाचे पदाधिकारी उपस्थित होते.

# वाहाळा बु येथे शाखा प्रमुख यांना मारहाण

**अविनाश पोहरे**

**अकोला :** वाहाळा बु येथे किरकोळ कारणावरुण शिवसेनेच्या शाखाप्रमुखाला दोघा भावांनी बेदम मारहाण केल्याची घटना १ सप्टेंबर रोजी घडली आहे या मारहाणीमध्ये शिवसेना शाखाप्रमुख रामहरी पल्हाड हे जखमी झाले आहेत. टोपले नेल्याच्या कारणावरुण ऐका गटातील एका व्यक्तीला असली शिवीगाळ करुण मारहाण करण्यात आली आहे. व शिवसेना शाखा प्रमुख यांना जीवे मारण्याची धमकी देण्यात आली. त्यामुळे एका गटाच्या रामहरी पल्हाड यांच्या फिर्यादीवरून शुभम भोकरे व आकाश भोकरे या भावाविरुद्ध चान्नी पोलिसानी विविध कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे.

# एकाचवेळी वाघाने केली सात बकऱ्यांची शिकार



**रविकुमार येमुर्ला**

**सिरोंचा :** तालुक्यातील बामणी वनपरिक्षेत्राअंतर्गत येत असलेल्या गंगनूर जंगल परिसरात चारण्यासाठी गेलेल्या शेळयांच्या कळपावर वाघाने हल्ला करुन ७ बक-यांची शिकार केल्याची घटना शुक्रवारी सायंकाळच्या सुमारास घडली. एकाचवेळी वाघाने सात बक-या ठार केल्याच्या घटनेने परिसरात एकच खळबळ उडाली आहे. प्राप्त माहितीनुसार बामणी वनपरिक्षेत्राअंतर्गत येत असलेल्या येनलाया या गावातील मडे बक्का येल्ला हा इसम नेहमीप्रमाणे शुक्रवारी बक-या चराईसाठी सिरकोंडा जंगलात गेला होता. दरम्यान सायंकाळी ५ वाजताच्या सुमारास गंगनूर जंगल परिसरात बक-या चारत असतांना एकाएक वाघाने कळपावर हल्ला चढविला. या हल्ल्यात सात बक-या ठार झाल्या. याची माहिती येल्ला यांनी वनविभागाने दिली. बामणी क्षेत्राचे वनपरिक्षेत्र अधिका-यांनी पथक पाठवून घटनास्थळाचा पंचनामा केला. मागील पंधरवड्यापूर्वी आसरअल्ली वनपरिक्षेत्रातील गेरपल्ली जंगलात वाघाने एका बैलासह २ बक-या, १ म्हैस ठार केली होते. यामुळे सिरोंचा वनपरिक्षेत्रात वाघाचा धुमाकूळ कायम असल्याने या परिसरातील नागरिकांनी सतर्क राहण्याचे आवाहन वनविभागाने केले आहे. हा हल्ल्यामुळे बामणी परिसरातील लोकांमध्ये एक दहशत पसरली असून जंगलात एकटा जाण्यास टाळत समोर येत आहे.

# गोमांस विक्री करणाऱ्याविरुद्ध अकोट पोलिसांची धडक कारवाई



**कु.चंचल पितांबरवाले**

**अकोट :** शहरातील अन्सार कॉम्प्लेक्स जवळ इफ्तेखार प्लॉट भागात गोमांस विक्री करणाऱ्या आरोपीच्या विरोधात शहर पोलिसांनी कारवाई केली.त्याच्याकडून १६७५०/- रूपयांचा मुद्देमाल जप्त केला. रविवारी शेख अशपाक शेख रहीम वय ४२ वर्ष रा.अकबरी प्लॉट,रहमानिया मजिद जवळ अकोट याच्या विरुद्ध पोलिस अंमलदार उमेश पराये यांनी शहर पोलिस स्टेशनला फिर्याद दिली. आरोपीकडे गोवंश जातीचे जनावरांचे मास (बैल) ८० किलो किंमत १६०००,कत्तलकरिता लागणारे साहित्य एक सुरा किंमत १०० रु,एक लाकडी ठोकळा किंमत ५० रु,एक वजन काटा किंमत ३०० रु,एक ५०० ग्रॅम वजन गोटा किंमत १०० रु,एक कु्हाड किंमत २०० रु, असा एकूण १६७५०/-रुपयाचा माल जप्त करण्यात आले.सदरची कारवाई उपविभागीय पोलिस अधिकारी रितू खोखर, शहर पोलिस निरीक्षक प्रकाश अहिरे यांच्या मार्गदर्शनात पोउपानि राजेश जवरे,पोहेका.उमेशचंद्र साळंके,उमेश पराये,नापोका.विजय चव्हाण, मनीष कुलट, सागर मोरे यांनी कारवाई केली.

# शिवसेनेच्या शिवसंपर्क अभियानाला सुरुवात



**महेश निमसटकर**

**भद्रावती :** शेकडो नागरिकांचा शिवसेनेत प्रवेश दिनांक २ सप्टेंबर २०२२ ला भद्रावती तालुक्यातील शिवसंपर्क अभियानाला गुडगाव या गावापासून सुरुवात करण्यात आली. या कार्यक्रमाचे औचित्य साधून गुडगाव गावात सायंकाळी ७.०० वाजता हनुमान मंदिर परिसरात मुकेश जीवतोड शिवसेना जिल्हाप्रमुख चंद्रपूर व नंदू पढाल तालुका प्रमुख भद्रावती यांच्या नेतृत्वात, राहुल मालेकर यांच्या पुढाकाराने सभा घेण्यात आली या सभेला उपजिल्हाप्रमुख अमित निब्रड, विधानसभा संघटक सुधाकर मिलमिले, तालुका संघटक बाळा क्षीरसागर, शहर प्रमुख घनश्याम आस्वलें, युवा सेना तालुकाप्रमुख महेश जीवतोडे, नंदोरी शाखाप्रमुख पवन ऐकरे इत्यादी पदाधिकारी उपस्थित होते, याप्रसंगी सर्व शिवसेना पदाधिकाऱ्यांनी शिवसेना या पक्षाबद्दल आणि ध्येय धोरणाबद्दल उपस्थित नागरिकांना माहिती दिली यानंतर गुडगाव, वडगाव, चोरा, सावरी इत्यादी गावातील शेकडो महिला व पुरुषांनी आम्ही सदैव शिवसेनेच्या पाठीशी राहील असा विश्वास देत शिवसेना पक्षात प्रवेश केला यावेळी जिल्हाप्रमुख मुकेश भाऊ जीवतोडे यांनी सुद्धा शिवसेना पक्ष हा नेहमी गोरगरीब व सामान्य जनतेच्या पाठीशी राहिला आहे आणि नेहमीच राहणार असे आश्वासन दिले. याप्रसंगी अनंता बावणे, राजेंद्र वैद्य, दसरत टोंगे, राजू नागोसे, चंदू टोंगे, लहू पोईंकर, अर्चना दोडके, छाया दोहतरे, मंदा रासेकर, तसेच शेकडो गावकरी उपस्थित होते.

# पणज येथे माता महालक्ष्मी यात्रा संपन्न



**कु.चंचल पितांबरवाले**

**अकोट :** पंचक्रोशीत जागृत म्हणून प्रसिद्ध असलेले पणज गावाचे आराध्य दैवत,भक्तांचे श्रध्दास्थान महालक्ष्मी मातेची यात्रेची सुरुवात दि.४ सप्टेंबर २०२२ रविवारी सकाळी अकोल्याचे उपजिल्हाधिकारी तथा भूसंपादन अधिकारी विश्वनाथजी घुगे यांचे हस्ते सपत्नीक पुजेने झाली.तद्नंतर संस्थानाचे विश्वस्त सुरेश दातीर यांनी घुगे साहेब यांचा शाल श्रीफळ व सौ.घुगेताई यांचा साडी चोळी देऊन ग्रामपंचायत सदस्य डॉ.रतनलाल तायडे यांचे हस्ते सत्कार करण्यात आला. पुजा आरती आटोपल्यानंतर मातेला नैवेद्य अर्पण करून भावीकांकरीता महाप्रसादाचे वितरण सुरू करण्यात आले.राज्यातून तसेच परराज्यातून मातेच्या भक्तांची उपस्थिती हजारांच्या संख्येने होती.सर्व भाविकांनी दर्शनाचा व महाप्रसादाचा लाभ घेतला. मोठ्या हर्षोल्लासात यात्रा संपन्न झाली असून लॉकडाऊन नंतर प्रथमच यात्रा भरत असल्यामुळे भक्तांची अलोट गर्दी झाली. यात्रेमध्ये आबालवृद्ध भावीकांसह आकोटचे आमदार प्रकाश भारसाकळे,अकोल्याचे उपजिल्हाधिकारी विश्वनाथजी घुगे,नायब तहसीलदार राजेश गुरव,मंडळ अधिकारी निळकंठ नेमाडे,राजेश बोडखे,तलाठी गिल्ले यांनी भेट दिली.उपविभागीय पोलीस अधीक्षक रीतू खोकर यांचे मार्गदर्शनात ग्रामीण चे ठाणेदार नितीन देशमुख व त्यांचे सहकारी अधिकारी,कर्मचारी,होमगार्डसह सर्वांनी चोख बंदोबस्त ठेऊन सहकार्य केले.यात्रेच्या यशस्वीतेकरीता सर्व धर्मीय तरुण तथा गावकरी यांनी तनमनधनाने प्रयत्न केले.यात्रेचे आयोजन संस्थानचे विश्वस्त डॉ सुरेश दातीर,शिवशंकर ठाकूर व त्यांचे सहकारी तथा आजुबाजूच्या सर्व गावकऱ्यानी सहभागी होऊन यशस्वी रीत्या पार पाडले.

# बोगस दस्त नोंदणी करणाऱ्यांवर गुन्हा




**दै. अधिकारनामा**

**पुणे :** हडपसर येथील मेगा सेंटरमधील सहायक दुय्यम निबंधक कार्यालयात जागेचा दस्त नोंदणी करताना दलालांमार्फत बनावट कागदपत्रे सादर करून दस्त नोंदणी करणाऱ्यावर हडपसर पोलिस ठाण्यात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. बनावट गुंठेवारी, बनावट अकृषिक दाखले (एन. ए. ऑर्डर) जोडून फसवणूक केल्याप्रकरणी १९ जणांविरोधात पोलिसांनी तब्बल सात गुन्हे दाखल केले आहेत. खासगी दलालांनी राज्य शासनासह पुणे आणि पिंपरी-चिंचवड महापालिकांच्या बांधकाम विभाग, तसेच उपविभागीय दंडाधिकारी हवेली यांची फसवणूक केल्याचा प्रकार समोर आला आहे. दरम्यान, एकाच वेळी फसवणूक झाल्याचे एवढे प्रकार समोर आल्यामुळे एकच खळबळ उडाली आहे. या प्रकरणी तपासासाठी विशेष पथक कार्यान्वित केले जाणार आहे. याबाबत विष्णू तुकाराम आम्ले (रा. फुरसुंगी) यांनी हडपसर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार नंदा नामदेव निंबाळकर, अमोल नामदेव निंबाळकर, अजित नामदेव निंबाळकर, सोनाली अतुल निंबाळकर आणि महेश ओमप्रकाश धुत (रा. लेकटाऊन सोसायटी, कात्रज ), तसेच त्यांना बेकायदा कामासाठी मदत करणाऱ्या दलालांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

महापालिकेच्या हडपसर कार्यालयात नोंदविण्यात आलेल्या दस्तास जोडण्यात आलेल्या कागदपत्रांच्या सत्यता, वैधता कायदेशीर बाबींसाठी, तसेच खोटे आढळल्यास नोंदणी अधिनियमाचे कलम ८२ अन्वये संपूर्ण जबाबदार असल्याचे प्रतिज्ञापत्र देण्यात आले आहे. ही सर्व कागदपत्रे बनावट असल्याचे प्राथमिक तपासात आढळून आले. या व्यवहारात सहायक दुय्यम निबंधक आणि पुणे महापालिकेच्या बांधकाम विकास विभागाची फसवणूक करण्यात आली आहे. अशाच पद्धतीने बनावट एन. ए. दाखले जोडून फसवणूक केल्याप्रकरणी सावळाराम भीमाजी कऱ्हे, सीताराम कऱ्हे, मंगल कऱ्हे, मंगल कोळपे, अंजना बापू कोळपे, बायडाबाई जालिंदर मिसाळ, लता राजाराम कोळपे यांच्या विरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. बनावट गुंठेवारी नियमितीकरणाच्या प्रकरणाचा दाखला जोडून दुय्यम निबंधक व पिंपरी-चिंचवड महापालिकेचे कार्यकारी अभियंता यांची फसवणूक केल्याबद्दल अरुण कृष्णा अल्हाट, पुष्पवती सोनवणे, विजया मुकुंदा साळवे, कल्पना खंडूजी कदम यांच्यातर्फे कुलमुख्यातर म्हणून सुशांत अनिल पाटील यांच्यासह इतरांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

तसेच सिद्धनाथ डेव्हलपर्सतर्फे जहांगीर हुसेन हमजुद्दीन मुल्ला (रा. आंबेगाव बु.) यांच्या विरोधात आणि श्री साई स्वराज डेव्हलपर्सतर्फे भागीदार पोपट बबन पायगुडे (रा. कात्रज) आणि हेमचंद सोमनाथ भाटी (रा. कात्रज) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दस्ताला बनावट दाखले जोडून उपविभागीय दंडाधिकारी हवेली यांची फसवणूक केल्याप्रकरणी समीर गोविंद कडू (रा. सुखसागरनगर, कात्रज) व त्यांना मदत करणाऱ्यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तसेच सातव पाटील एंटरप्रायसेसतर्फे निखिल किसन सातव (रा. वाघोली) आणि त्यांना मदत करणाऱ्यांच्या विरोधात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. याबाबत काही दिवसांपूर्वी हडपसर पोलीस ठाण्यात तक्रारी आल्या होत्या. त्यानुसार पडताळणी समिती नेमण्यात आली होती. या समितीने अहवाल दिल्यानंतर फौजदारी गुन्हे दाखल करण्यात आले.

# वडीगोद्री, शहागड, गोंदी परिसरात वादळी पाऊस



**दै. अधिकारनामा**

**जालना :** वडीगोद्री, शहागड, गोंदी परिसरात काल (शनिवार) सायंकाळी वादळी वाऱ्यासह मुसळधार पाऊस झाला. या पावसामुळे परिसरातील कपाशी, ऊस, बाजरी, कडूळ हि पिके भूईसपाट झाली. तर फळबागांची फळगळ मोठ्या प्रमाणात झाली आहे. यामुळे शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले. पावसाची वाट पाहत बसलेल्या शेतकऱ्यांना वादळी वाऱ्याने मोठा फटका दिला. मोठी व दोडे आलेली कपाशी पूर्ण खाली झोपली. यामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. महिना भरापासून पावसाचा खंड पडल्याने बळीराजा पाऊस कधी येतो याची वाट पाहत बसला होता. मात्र पावसाबरोबर वादळी वारे आल्याने सर्व पिके वाऱ्याच्या वेगाने झोपली. अनेक ठिकाणचे पत्रे उडून गेले, हॉटेलचे शेड पडले. शेतातील परिसरातील मोठं मोठी झाडे उन्मळून पडली. अनेक ठिकाणी विद्युत पोलही पडले आहेत. पिकांच्या झालेल्या नुकसानीमुळे शेतकरी हतबल झाला आहे. वादळी वाऱ्यामुळे नुकसान झालेल्या पिकांचे पंचनामे करण्यात यावे अशी मागणी शेतकरी वर्गातून होत आहे.

# आदिवासी तरुणांनी स्विकारला छोटे कुटुंब सुखी कुटुंबाचा मंत्र

**लक्ष्मण पवार**

**नाशिक :** तालुक्यातील अतिदुर्गम भागातील उंबरठाण येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात १०५ पुरुष शस्त्रक्रिया करून स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव साजरा करण्यात आला. महाराष्ट्र शासन कुटुंब कल्याण विभाग व जिल्हा परिषद आरोग्य विभागामार्फत मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद नाशिक लीना बनसोड, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.कपिल आहेर यांचे मार्गदर्शना त्यांना राज्य शासन व केंद्र शासनाच्या कुटुंब नियोजन कार्यक्रमांतर्गत दिल्या जाणाऱ्या आर्थिक बक्षीसाचा त्यांना फायदा देण्यात आला यप्रसंगी उपस्थित लाभार्थी व त्यांच्या नातेवाईकांना अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ युवराज देवरे यांनी कुटुंब नियोजनाचे महत्त्व गरज तसेच पुरुष शस्त्रक्रियेचा कुटुंब कल्याण कार्यक्रमा मधला सहभाग याबाबत मार्गदर्शन केले कार्यक्रम यशस्वीतेसाठी शल्य विशारद,डॉ. समाधान पाटील डॉ. वेढे, तालुका आरोग्य अधिकारी डॉ.दिलीप

आजच्या काळात तरुण पिढी सुशिक्षित झाली आहे. शिक्षणामुळे जनजागृती झाली असून युवकांना लोकसंख्येचे दुष्परिणामांची जाणीव झाली असून छोट्या कुटुंबाचे महत्त्व समजले आहे. पुरष शस्त्रक्रिये बाबत असलेला गैरसमज आता दुर झाला आहे. आरोग्य विभागातील कर्मचारी, आशा स्वयंसेविका,अंगणवाडी सेविका,अंगणवाडी कार्यकर्ती यांनी घरोघरी जाऊन मार्गदर्शन केले आहे. त्यामुळेच हा कॅम्प यशस्वी झाला आहे. **- डॉ. दिलीप रणवीर, तालुका वैद्यकीय अधिकारी.**



नुसार प्राथमिक आरोग्य केंद्र उंबरठाण या आदिवासी भागातील अति दुर्गम प्राथमिक आरोग्य केंद्राने एक नाविन्यपूर्ण संकल्प करून तो पूर्णत्वास नेला. येथील आरोग्य कर्मचारी,अधिकारी यांनी जास्तीत जास्त पुरुष शस्त्रक्रिया एका वेळेस करण्याचा संकल्प केला अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ युवराज देवरे तथा कुटुंब कल्याण नोडल अधिकारी यांनी विशेष प्रयत्न करून दिनांक २ सप्टेंबर रोजी एकाच दिवशी परिसरातील विविध गावांमधून १०५ पुरुष शस्त्रक्रिया करण्यासाठी अपेक्षित लाभार्थ्यांची यादीनुसार त्यांना कुटुंब नियोजनाचे महत्त्व पटवून योग्य असे समुपदेशन करण्यात आले तसेच लहान कुटुंबाचे महत्त्व विशद करण्यात आले त्यानुसार मत परिवर्तन झालेले लाभार्थी यांची यादी करण्यात आली त्यानुसार नियोजन करून उंबरठाण येथील प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये अत्यंत शिस्तबद्ध पद्धतीने हे शिबिर संपन्न झाले या शिबिरामध्ये एकूण १०५ लाभार्थ्यांच्या एकाच दिवशी शस्त्रक्रिया करण्यात आल्या तसेच रणवीर, प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ.राजेश चौधरी,डॉ.विनय कुमावत यांनी सर्व ऑपरेशन करून विशेष मेहनत घेतली तसेच तालुक्यातील बोरगाव प्राथमिक आरोग्य केंद्र येथे आज २१ पुरुष शस्त्रक्रिया करण्यात आल्या तालुक्यामध्ये एकाचवेळी १२६ पुरुष शस्त्रक्रिया करून जिल्हा परिषदेच्या आरोग्य विभागाने अमृत महोत्सव साजरा केला तसेच प्राथमिक आरोग्य केंद्रातील प्रयोग शाळा वैद्यानिक अधिकारी अभिनव जाधव, औषध निर्माण अधिकारी देविदास ठेपणे, आरोग्य कर्मचारी,इंदास पावरा,रामदास गावित,लक्ष्मण गायकवाड,वानखोडे,दिनेश पवार,समुदाय केंद्र अधिकारी शीतल गाडे,शिवानी मिसाळ, डॉ.विशाल सोनावणे,परिच 'आकाश गुंजाळ,भूमेश विसपुते,प्रकाश वळवी. प्रा.आ.केंद्र पांगारणे,बाऱ्हे,मनखेड येथील कर्मचारी यांनी विशेष परिश्रम घेतले. आरोग्य सहाय्यक चौधरी नाना,आरिफ नाना यांनी सर्वांचे आभार मानले जिल्हास्तरातून सर्वांचे कौतुकाचा वर्षाव होत आहे.

# अमळनेरला दोन महिलांना जिवंत जाळण्याचा प्रयत्न



**दै. अधिकारनामा**

**जळगाव :** जुन्या वादातून दोन महिलांना पेट्रोल टाकून जिवंत जाळण्याचा प्रयत्न अमळनेर तालुक्यातील तरवाडे येथे घडली असून मारवड पोलीस स्थानकामध्ये संबंधितांविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, विजय सदाशीव पाटील यांनी फिर्यादीनुसार त्यांचा भाऊ संदीप सदाशिव पाटील याने शरद उखा पवार व अलका शेळके-मोरे यांच्या विरुद्ध खंडणीचा गुन्हा दाखल केला होता. त्याचा वचपा काढण्यासाठी शरद व विनोद पवार यांनी संदीप यांच्या पत्नीला गाव दरवाजाजवळ अडवत आमच्याविरुद्ध दाखल केलेले गुन्हे मागे घ्या, नाहीतर जिवंत सोडणार नाही अशी धमकी दिली. धमकाल्यानंतर विनोद पवार, नितीन पवार, रूपाबाई पवार, शरद पवार, उखा पवार, विमलबाई पवार (सर्व रा. तरवाडे) तसेच रातीलाल पाटील, हर्षल रतीलाल पाटील व प्रमोद पाटील (रा. पिंपळे) हे घटनास्थळी आले. त्यांच्याकडे लाठ्या व लोखंडी रॉडसह हातात पेट्रोलची कॅन होती. या कॅनमधून पेट्रोल काढून त्यांनी फिर्यादीची आई व वहिनी यांच्या अंगावर पेट्रोल टाकत त्यांना पेटवून देण्याचा प्रयत्न केला. तर संदीप पाटील यांच्या डोळयात मिरची पावडर टाकून मारहाण केली. यप्रसंगी मदतीसाठी आलेल्या सतीश पाटील याला देखील मारहाण करण्यात आली. या वादामध्ये संदीप व सतीश दोघे गंभीर जखमी झाले असून त्यांना तातडीने रुग्णालयात दाखल केले आहे. यप्रकरणी मारवाड पोलीस ठाण्यात विनोद पवार, नितीन पवार, रूपाबाई पवार, शरद पवार, उखा पवार, विमलबाई पवार, (सर्व राहणार तरवाडे, ता. अमळनेर), रतिलाल पाटील, हर्षल पाटील आणि प्रमोद पाटील (सर्व रा. पिंपळे, ता. अमळनेर) यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक जयेश खलाणे हे करीत आहेत.

## थोडक्यात

### व्यक्तिगत मोबाईलने वाहनांचे फोटो काढू नका

दै. अधिकारनामा



**मुंबई :** वाहनचालकांवर कारवाई करताना फोटो किंवा व्हिडीओ चित्रीकरण करण्यासाठी स्वतःचा खाजगी मोबाईलचा वापर न करता फक्त ई-चलान मशिनचाच वापर करावा, असे आदेश राज्य वाहतूक विभागाचे अप्पर पोलीस महासंचालक कुलवंतकुमार सारंगल यांनी जारी केले आहेत. जे पोलीस अधिकारी आणि अंमलदार स्वतःच्या खाजगी मोबाईलचा वापर करतील त्यांच्यावर कारवाईचे आदेश देण्यात आले आहेत. माहिती अधिकार कार्यकर्ता दिपक पाटील यांच्या १८ ऑगस्टच्या तक्रार अर्जानुसार सरंगल यांनी नव्याने आदेश दिले आहेत. यात कसूरदार वाहन चालकांवर दंडात्मक कारवाई करताना फोटो, व्हिडीओ काढण्यासाठी पोलीस स्वतःच्या खाजगी मोबाईलचा वापर करतात. मोबाईलवर केलेले चित्रण काही कालावधीनंतर ई चलान मशिनमध्ये अपलोड करतात. यात गाडीचे संपूर्ण फोटो न टाकता फक्त नंबर प्लेटचा फोटो टाकतात. त्यामुळे गाडी कोणती आहे, हे ओळखणे अशक्य होते अशा आशयाचा तक्रार अर्ज करण्यात आला आहे.वाहन चालकांवर कारवाई करताना ई चलान मशिनव्दारेच सर्व कारवाई केली जाईल याबाबत खबरदारी घ्यावी. मार्च २०२० रोजी राज्यातील सर्व घटक प्रमुख आणि नोडल अधिकाऱ्यांना आदेश देण्यात आले होते. त्यानंतर आता पून्हा नव्याने हे आदेश देण्यात येत असल्याचे परिपत्रकात नृमूद करण्यात आले आहे.

## हडपसरमध्ये नवीन कालव्यात विसर्जन नाही

दै. अधिकारनामा



**हडपसर :** कोरोना संकटानंतर या वर्षी निर्बंधविरहित गणेशोत्सव साजरा केला जात आहे. असे असले तरी नैसर्गिक विसर्जन स्थळांवर म्हणजे हडपसरमधून वाहणारा नवीन कालवा, तसेच मांजरी बुद्रुक येथील मुळा-मुठा नदीपात्र येथे नागरिकांनी थेट गणेश विसर्जन करू नये, असे आवाहन करण्यात आले आहे. महापालिकेच्या हडपसर क्षेत्रीय कार्यालयांतर्गत सुमारे ३६ ठिकाणी मूर्ती संकलनाची व्यवस्था करण्यात आली आहे. याशिवाय, १५ फिरते विसर्जन हौद यांची व्यवस्था महापालिकेकडून करण्यात आली आहे. नवीन कालवा आणि मांजरी बुद्रुक येथील मुळा- मुठा नदी ही या परिसरातील नैसर्गिक विसर्जन स्थळे आहेत. गेली अनेक वर्षे येथे नागरिक गणेश विसर्जन करीत होते. मात्र ,गेल्या वर्षी कोरोनाच्या पार्श्वभूमीवर याठिकाणी गणेश विसर्जन न करण्याचे आवाहन करण्यात आले होते. याही वर्षी महापालिकेने येथे गणेश विसर्जन न करण्याचे आवाहन केले आहे. कालवा परिसर आणि नदीच्या काठावर असलेल्या विसर्जन घाटांवर बांबू, तसेच बॅरिकेट्स बांधण्यात येणार आहेत .त्यामुळे नागरिकांना त्यांच्या जवळ असलेल्या महापालिकेच्या मूर्ती संकलन केंद्रात गणेशमूर्ती द्यावी लागणार आहे. प्रत्येक प्रभागात किमान ७-८ मूर्ती संकलन केंद्रे सुरू केली आहेत.

प्रभाग क्रमांक २२,२३,२६ आणि ४२, तसेच नव्याने समाविष्ट करण्यात आलेल्या गावांत ३६ ठिकाणी मूर्ती संकलन केंद्र व निर्माल्य जमा करण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. याशिवाय, हडपसर – मुंढवा क्षेत्रीय कार्यालयाचे १५ फिरते हौद तयार असून, प्रत्येक आरोग्य कोठीकडून तो फिरण्याचे नियोजन करण्यात आले आहे. यासाठी ३६ मोबाईल टॉयलेट, १२ जीवरक्षक व २५१ स्वच्छता कर्मचारी व मदतनीस यांची गणेश विसर्जन व्यवस्थेसाठी नेमणूक करण्यात आली आहे.ग्रामपंचायत कार्यालय हांडेवाडी, ग्रामपंचायत कार्यालय होळकरवाडी, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा शेवाळेवाडी, ए. एम. कॉलेज महादेनगर, राम मंदिर मांजरी फार्म, पी.एम.आर.डी प्लॉट शेवाळेवाडी फाटा, ग्रामपंचायत कार्यालय मांजरी बुद्रुक, जिल्हा परिषद शाळा म्हसोबा वस्ती मांजरी

## निमगाव केतकीला ९० कोटींची पाणी योजना


दै. अधिकारनामा



**इंदापूर :** निमगाव केतकीला जीवन प्राधिकरण, जलजीवन मिशन, हर घर जल योजना अंतर्गत ९० कोटी रुपयांच्या योजनेला अंतिम प्रशासकीय मंजुरी मिळाली आहे. आता या भागातील नागरिकांचा पिण्याचा पाण्याचा प्रश्न कायमस्वरूपी सुटणार आहे. यामुळे निमगावकरांची पिण्याच्या पाण्याची चिंता मिटणार असल्याची माहिती माजी राज्यमंत्री, इंदापूर तालुक्याचे आमदार दत्तात्रय भरणे यांनी दिली. शनिवारी (दि. ३) निमगाव केतकीचे सरपंच प्रवीण डोंगरे, उपसरपंच मीना भोंग, माजी सभापती दत्तात्रय शेंडे, दशरथ डोंगरे, मच्छिंद्र चांदणे यांच्यासह ग्रामपंचायतचे सदस्य, नागरिक यांनी माजी राज्यमंत्री दत्तात्रय भरणे यांचा भरणेवाडी येथे शाल, श्रीफळ, फेटा आणि पेढा भरवून योजना मंजूर केल्याने जाहीर सत्कार केला. या वेळी माजी राज्यमंत्री भरणे गावकऱ्यांशी संवाद साधताना बोलत होते. या वेळी भरणे म्हणाले, महाविकास आघाडीच्या माध्यमातून तत्कालीन उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या अध्यक्षतेखाली इंदापूर तालुक्यातील २४६ गावांसाठी जलजीवन मिशन योजनेचा प्रारूप आराखडा मंजूर करण्यात आला होता. महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, जलजीवन मिशन, हर घर जल योजनाअंतर्गत निमगाव केतकी गावठाणासह जवळपास ४६ वाड्या-वस्त्यांवरील माऊलींच्या डोक्यावरील हंडा कायमस्वरूपी उतरणार आहे. दरडोई ५५ लिटर प्रतिमाणसी पाण्याचे वितरण होणार आहे.

या योजनेत गावामध्ये दोन ठिकाणी साठवण तलाव, नवीन पाच टाक्या, पंपिंग मशिनरी, जलशुद्धीकरण केंद्र, सौरऊर्जा प्रकल्प आदींचा समावेश असणार आहे. या वेळी सरपंच प्रवीण डोंगरे म्हणाले की, माजी राज्यमंत्री दत्तात्रय भरणे यांच्या सातत्याच्या पाठपुराव्यामुळे नवीन योजनेच्या माध्यमातून गावासह वाड्यावस्त्यांवरिल पिण्याच्या पाण्याचा प्रश्न कायमस्वरूपी मिटणार आहे. या वेळी माजी उपसरपंच सचिन चांदणे, संदीप भोंग, भारत मोरे, मनोहर मिसाळ, बाबासाहेब भोंग, अशोक भोंग, मधुकर भोसले, माणिक भोंग, संतोष जगताप, सागर मिसाळ, अजित मिसाळ, अभिजित गुरव आदी मान्यवर उपस्थित होते.

## पहिल्या माळेपासून भाविकांना होणार सप्तश्रृंगीदेवीचे दर्शन



दै. अधिकारनामा

**नाशिक :** दीड महिन्यापासून सप्तश्रृंगीदेवीच्या मुर्तीचे देखभाल व संर्वधन कामामुळे देवी संस्थानाच्या निर्णयानुसार बंद ठेवण्यात आलेले मंदिरसंबधी रविवारी, दि. ४ पत्रकार परिषदेतून नवरात्रौ उत्सवात पहिल्या माळेपासून भाविकांसाठी मंदिर खुले करण्याबाबत अधिकृत घोषणा करण्यात येणार आहे. श्री क्षेत्र सप्तश्रृंगड हे उत्तर महाराष्ट्राचे कुलदैवत म्हणून ओळखले जाते. या ठिकाणी महाराष्ट्रासह गुजरात, मध्यप्रदेश या ठिकाणावरून भाविक मोठ्या प्रमाणात हजेरी लावतात. सप्तश्रृंगड हे पवित्र तीर्थक्षेत्र पर्यटन स्थळ असल्याने या ठिकाणी भक्तांची सदैव रेलचेल सुरु असते. रोजची मोठ्या प्रमाणातील वर्दळ पाहता गडावरील गर्दीचे प्रमाणे वाढले होत. परंतु गेल्या २२ जुलैपासून सप्तश्रृंगी देवीच्या मूर्तीचे वज्रलेप करण्याच्या कामामुळे आणि मूर्ती संवर्धनाचे काम सुरु असल्याने व गडावरील पाय-या दुरुस्तीच्या कामामुळे गडावरील दर्शन गेल्या दीड ते पावणे दोन महिन्यापासून सप्तश्रृंगीचे मंदिर हे बंद ठेवण्यात आले आहे. मात्र सप्तश्रृंगी मंदिर दर्शनासाठी नवरात्रौ उत्सवामध्ये खुले करण्यात यावे या भक्तांच्या मागणीनुसार लवकराच लवकर गडावरील कामे पूर्णत्वास आले असून नवरात्रौ उत्सवात पहिल्या माळेपासून मंदीर खुले करुन देणार असल्याची घोषणा देवी संस्थानातर्फे पत्रकार परिषद घेऊन रविवारी, दि.४ सप्टेंबरला करणार असल्याचे सांगण्यात आले आहे. सप्तश्रृंगगड हे समुद्र सपाटीपासून ५००० मीटर उंचीवर असल्याने व दहा किलोमीटरचा घाट पार करून सप्तश्रृंगी गडावरती यावे लागते. पूर्वी कोरोना काळामध्ये सप्तश्रृंगीचे मंदिर हे एक वर्षासाठी बंद करण्यात आले होते. त्यानंतर पुन्हा मंदिराचे कामाकरीता दीड ते दोन महिने मंदिर बंद ठेवल्याने सप्तश्रृंगी गडावरील व्यापाऱ्यांचे अर्थकरण ठप्प झाले होते. मंदिरा संबधी तहसीलदार, देवी संस्थानाचे विश्वस्त व प्रशासकीय अधिकारी, ग्रामपंचायत सरपंच, सदस्य व व्यापारी यांसह ग्रामस्थांबरोबर चर्चा करण्यात आली. यामध्ये मंदिरातील मूर्तीसह इतर कामे थोड्याफार प्रमाणात बाकी असल्याने तसेच पुरोहित मार्गदर्शन सदरची विधीवत पुजा करून पितृपक्ष झाल्यावर नवरात्रीच्या पहिल्या दिवशी सप्तशुंगीचे मंदिर भाविकांसाठी खुले करण्याबाबत ग्रामस्थांशी प्राथमिक चर्चा करण्यात आलेली आहे. त्यानुसार घेण्यात आलेल्या निणऱ्याबाबत रविवारी, दि.४ पञकारपरिषद घेण्याबाबत देवी संस्थानने पञ जाहीर केले आहे.

## वर्ग २ च्या जमीन रूपांतरातून 'महसुल' कोट्यधीश

दै. अधिकारनामा




**नाशिक :** वर्ग २ च्या जमीनींचे १ वर्गमध्ये रूपांतरणाच्या प्रक्रीयेअंतर्गत जिल्ह्यात २०१९-२० ते २०२१-२२ या तीन वर्षात प्रशासनाने १ हजार ४१५ आदेश काढले आहेत. या प्रक्रीयेमधून प्रशासनाच्या तिजोरीत तब्बल १५३ कोटी २९ लाख २५ हजार २९३ रूपयांचा महसुल जमा झाला आहे. राज्य शासनाने वर्ग-२ च्या जमीनी वर्ग १ मध्ये रूपांतरण करून घेण्यासाठी सवलत देण्याचा महत्वपूर्ण निर्णय ८ मार्च २०१९ ला घेतला. या आदेशानूसार तीन वर्षासाठी म्हणजे ७ मार्च २०२२ पर्यंत वर्ग २ च्या जमीनींचे रूपांतरणासाठी सवलत दिली होती. त्यामध्ये भोगवटादारांना जमीनीच्या प्रकारानूसार १५, २० आणि ५० टक्यांपर्यंत कर भरून भोगवटदारांना त्यांची जमीन वर्ग १ मध्ये रूपांतर करून देण्यात येत आहे. परंतू, ७ मार्चनंतर जमीन वर्ग-१ मध्ये रूपांतरीत करण्यासाठी ७५ टक्के रक्कम भरावी लागते आहे. त्यामुळे जिल्ह्यातील अधिकधिक नागरिकांनी शासनाच्या संधीचा लाभ घेत त्यांची वर्ग-२ ची जमीन वर्ग -१ मध्ये वर्ग करून घेतली. जिल्ह्यात २०१९ पासून वर्ग-२ च्या जमीनीचे वर्ग-१ मध्ये रूपांतरीत करण्याचे १ हजार ४१५ आदेश प्रशासनाने काढले आहे. या प्रक्रीयेमधून प्रशासनाला १५३ कोटींहून अधिकचा महसुल प्राप्त झाला आहे. त्यातही २०२१-२२ या आर्थिक वर्षात वर्ग-१ चे सर्वाधिक ८६४ आदेश प्रशासनाने काढले आहेत. त्यामधून ११२ कोटी ४५ लाख ८ हजार १३४ रूपयांचा महसुल प्रशासनाला मिळाला. तत्पूर्वीच्या दोन वर्षात मात्र, कोरोना संकटामूळे या प्रक्रियेला काहीसा ब्रेक लागला. २०१९-२० मध्ये २७० आदेशामधून केवळ १६ कोटी १८ लाख ३१ हजार ५०५ तसेच २०२०-२१ ला २८१ प्रकरणातून २४ कोटी ६५ लाख ८५ हजार ६४५ रूपयांचा महसुल प्राप्त झाला.

राज्यभरात वर्ग-२ भोगवटाअंतर्गत भुमीहीन, मागासवर्गीय, शेतमजूर, सैनिक, गृह निर्माण संस्थाना शेती, निवासी, वाणिज्यिक व औद्र्यागीक वापरासाठी नागरिकांना भोगवटादार वर्ग २ अंतर्गत जमीनींचे वाटप करण्यात आले आहे. जिल्हाधिकारी, प्रांतधिकारी व तहसीलदारांमार्फत या जमीनींचे वितरण करण्यात आले. पण ज्या उद्देशाने या जमीनी दिल्या तो बाजूला पडत जमीनींचा वापर निवासासाठी होत असल्याचे समोर आले. त्यामुळे शासनाने वर्ग-२ मधून वर्ग-१ ला जमीन वर्गात सवलत देण्याचा निर्णय घेतला. भोगवटादार वर्ग २ च्या जमीनीचे वर्ग-१ मध्ये रूपांतरण सवलतीसाठी ७ मार्च २०२२ डेडलाईन होती. पण राज्यभरातून या योजनेला चांगला प्रतिसाद लाभल्याने त्यास दोन वर्षे मुदतवाढ देण्यासंदर्भात शासन विचाराधीन होते. त्यानूसार जुलैमध्ये प्रारूप आदेश काढत जिल्हानिहाय नागरिकांकडून हरकती व सूचना मागविल्या होत्या. डिसेंबरपर्यंत मुदतवाढीच्या निर्णयावर शिक्कामोर्तब होण्याची शक्यता आहे.

## जळगाव जिल्ह्यातील शेतकऱ्यांना मिळाली ३३४ कोटींची मदत

दै. अधिकारनामा



**जळगाव :** हवामानावर आधारीत फळपिक विमा काढलेल्या नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या खात्यामध्ये निधी जमा होण्यासाठी येणाऱ्या विलंबाची दखल घेऊन राज्याचे पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्री ना. गुलाबराव पाटील यांनी जिल्हाधिकाऱ्यांसह कृषी व विमा कंपनीच्या अधिकाऱ्यांची आढावा बैठक घेतली. यामध्ये शुक्रवार, दि.२ पर्यंत जिल्ह्यातील नुकसानग्रस्त शेतकऱ्यांच्या खात्यामध्ये हवामानावर आधारित फळपीक विम्याची तब्बल ३३४ कोटी ७० लक्ष रूपयांची रक्कम जमा होणार असल्याचे विमा कंपनीतर्फे सांगण्यात आल्याने जिल्ह्यातील शेतकऱ्यांना दिलासा मिळाला आहे. हवामानावर आधारीत फळपिक विमा ज्या शेतकऱ्यांनी काढला आहे. याबाबतची माहिती जाणून घेण्यासाठी पाणीपुरवठा मंत्री पाटील यांच्या उपस्थितीत आढावा बैठक घेण्यात आली. हवामानावर आधारीत फळपीक विमा योजनेंतर्गत जिल्ह्यातील केळी उत्पादक शेतकऱ्यांना नुकसान भरपाईपोटी ३७५ कोटी रुपयांची रक्कम मंजूर झाली असून, इतर जिल्ह्यांमधील शेतकऱ्यांना ती रक्कम मिळाली. मात्र जळगाव जिल्ह्यातील शेतकऱ्यांना अद्र्याप का मिळाली नाही? याबाबत ना. पाटील यांनी विचारणा केली. त्या अनुषंगाने, संबंधीत बैठकीत पीक विमा कंपनीच्या प्रतिनीधींसोबत चर्चा केल्यानंतर, ही रक्कम शुक्रवारपर्यंत शेतकऱ्यांच्या खात्यावर वर्ग करण्यासंदर्भात विमा कंपनीच्या अधिकाऱ्यांना ना. पाटील यांनी तंबी दिली. या अनुषंगाने ३३४ कोटी ७० लक्ष रूपयांची रक्कम ही शेतकऱ्यांच्या थेट खात्यात जमा झाली आहे. त्यामुळे जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी मंत्री गुलाबराव पाटील यांचे आभार मानले आहे.

अमळनेर- ५ कोटी ९८ लाख, भडगाव-२ कोटी ८६ लाख रूपये, भुसावळ ४ कोटी ६६ लाख, बोदवड ४ कोटी ८७ लाख, चाळीसगाव १ कोटी ०२ लाख, चोपडा ४२ कोटी ७१ लाख, धरणगाव ६ कोटी ३४ लाख, एरंडोल ३ कोटी ७२ लाख; जळगाव ३४ कोटी ८२ लाख, जामनेर १०० कोटी ५५ लाख, मुक्ताईनगर ३९ कोटी ३९ लाख, पाचोरा २ कोटी ९८ लाख, पारोळा ९२ लाख ९६ हजार, रावेर १२० कोटी ९२ लाख आणि यावल ६३ कोटी १६ लाख रूपये.

## मनपातील अधिकारांच्या विकेंद्रीकरणाचीच लूट

दै. अधिकारनामा

**नाशिक :** महापालिकेचे तत्कालीन आयुक्त रमेश पवार यांनी, लोकांची कामे कमीत कमी वेळेत न अडखळता व्हावी, यासाठी विभागीय अधिकाऱ्यांना विशेष अधिकार दिले. नागरिकांच्या दृष्टीने ही बाब खरोखरच कौतुकास्पद म्हणावी लागेल. परंतु, अधिकारांचे विकेंद्रीकरण करून दिलेल्या जादा अधिकारांचा गैरवापर करून जनतेच्या आणि प्रशासनाच्या डोळ्यात धूळफेक करण्याचे काम काही विभागीय अधिकाऱ्यांकडून सर्रास सुरू असल्याने ही एकप्रकारे अधिकारांच्या विकेंद्रीकरणाची लूटच म्हणावी लागेल. याचा सारासार विचार करून, मनपा आयुक्तांनी विभागीय अधिकाऱ्यांना दिलेल्या विशेष अधिकारांबाबत योग्य तो निणऱ्य घेण्याची वेळ पुन्हा आली आहे. अधिकारांचा गैरवापर झाल्याचा प्रकार पश्चिम विभागीय कार्यालयाकडून घडला. परंतु, त्याबाबत आयुक्तांकडून कोणतीही ठोस भूमिका घेतली गेली नाही. प्रशासनाकडूनच अशा प्रकारे दुर्लक्ष होत असेल, तर जादा अधिकार देण्याचे उद्देश सफल होतील का? शहरवासीयांना सर्व प्रकारच्या पायाभूत आणि मूलभूत सोयी सुविधा तसेच विविध प्रकारच्या परवानग्या विनाविलंब मिळाव्यात तसेच लोकप्रतिनिधींमार्फत नागरी कामांना तत्काळ चालना मिळावी, या चांगल्या उद्देशाने तत्कालीन आयुक्त रमेश पवार आणि त्याही आधीच्या आयुक्तांनी अधिकारांचे विकेंद्रीकरण करत विभागीय



अधिकाऱ्यांना जादा अधिकार दिले. यामागील उद्देश चांगला असला, तरी त्याचा गैरफायदा घेणारे महाभागही काही कमी नाहीत. त्यामुळे चांगले उद्देश पिछाडीवर पडून, नको त्या विषयांना चालना मिळत असल्याने याचासाठी अधिकारांचे विकेंद्रीकरण केले का, असा प्रश्न पडावा. सध्या गणेशोत्सवाचा धूमधडाका सर्वत्र सुरू आहे. या उत्सवाचा आनंद द्विगुणित करण्यासाठी शहरातील गणेश मंडळांनी भव्य-दिव्य असे देखावे उभारले आहेत. अनेक ठिकाणी मनोरंजनाच्या खेळणी, रहाटपाळणे उभारण्यात आले आहेत. शहरातील मध्यवर्ती ठिकाण असलेल्या बी. डी. भालेकर मैदानावरही खेळणी उभारण्यासाठी परवानगी मागण्यात आली. खरे तर कोरोनामुळे आणि त्याही आधी म्हणजे आठ ते दहा वर्षांपासून भालेकर मैदान परिसरात रहाट पाळणे उभारण्यास परवानगी दिली जात नसताना, पश्चिम विभागीय कार्यालयाने आपल्या अधिकारात परवानगी देऊन टाकली. अर्थात, कागदोपत्री ही परवानगी हाताने फिरविणारे पाळणे आणि खेळणी यासाठी असली, तरी प्रत्यक्षात मात्र त्या ठिकाणी २० ते २५ फूट उंचीचे इलेक्ट्रिक पाळणे गैरमार्गाने उभारण्याचे काम सुरू होते. असे असताना, पश्चिम विभागाचे अधिकारी आणि संबंधित कर्मचाऱ्यांना याचा थांगपत्ता नसणे, हा प्रकार म्हणजे संशयास्पदच म्हटला पाहिजे. विभागीय अधिकारी मदन हरिश्चंद्र यांनी तर, इतर कामे असल्यामुळे माझे भालेकर मैदानाकडे जाणेच झाले नाही, असे मोघम उत्तर देऊन टाकले. परवानगी दिलेल्या अधिकाऱ्याने परवानगी पत्रात काय-काय नमूद केले आहे, हेच माहिती नसल्याचे सांगत एकप्रकारे प्रशासनाचा भोंगळ कारभारच उघड केला आहे. भव्य-दिव्य असे रहाटपाळणे हे अनेकदा सण, उत्सव, यात्रेत जीवघेणे ठरलेले आहेत.

त्यामुळे त्यासंदर्भात स्थानिक स्वराज्य संस्था, पोलिस, अग्निशमन विभाग यांची परवानगी आणि इन्स्पेक्शन झाल्याशिवाय उभारताच येत नाही, असे असताना इथे मात्र केवळ विभागीय अधिकाऱ्याच्या एका पत्रावर बिनदिक्तपणे पाळणे उभारण्याचे काम सुरू होते. याबाबत अग्निशमन विभागालादेखील या प्रकाराची माहिती नव्हती. अशाप्रकारे आपल्याला मिळालेल्या जादा अधिकारांचा गैरवापर करून नागरिकांच्या जिवाशी खेळू नये. पश्चिम विभागीय कार्यालयाप्रमाणेच नाशिकरोड विभागीय कार्यालयाच्या दुर्लक्षामुळे म्हणा किंवा पाठबळामुळे, काही दिवसांपूर्वी सुमारे ४० लाखांहून अधिक कर रकमेचा अपहार झाल्याचा प्रकार समोर आला होता. एखाद-दुसरा कर्मचारी थेट महापालिकेच्या कर वसुलीचा अपहार करतो आणि त्याची कानोकान खबर ना विभागीय अधिकाऱ्यांना असते, ना मनपा प्रशासनातील वरिष्ठांना. याबाबत लेखा परीक्षण विभागाने चौकशी केली आणि त्यातूनही हेच सत्य बाहेर आले. परंतु, केवळ संबंधित लिपिकाला निलंबित करण्याची कारवाई झाली आणि अधिकार असलेल्या अधिकाऱ्यांना मोकळे रान करून देण्यात आले.

## पत्नीला पोटगी, घरभाडे देण्याचा कोर्टाचा आदेश

दै. अधिकारनामा



**पुणे :** हुंडा कमी दिला आणि मुलगी झाली म्हणून सासरी अनान्वित छळ सोसणाऱ्या पत्नीला दरमहा अंतरिम स्वरींपात २७ हजार रुपये पोटगी आणि घरभाडे देण्याचे आदेश प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी सी. पी. शेळके यांच्या न्यायालयाने पतीला दिले. या प्रकरणात पीडित पत्नीने पतीसह सासरच्या मंडळींविरोधात २७ नोव्हेंबर २०१३ रोजी चाकण पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. विजय आणि लता (नावे बदलली आहेत) यांचा १७ जानेवारी २०१३ रोजी पारंपरिक पद्धतीने विवाह झाला. त्यांना लग्नानंतर एक मुलगी झाली. लग्नात पुरेसा हुंडा दिला नाही म्हणून पतीसह सासरची मंडळी लताला मारहाण करायची. मुलगी झाल्यानंतर सासरच्या मंडळींनी लताला घराबाहेर काढले होते. सासरी होणारा छळ असह्य झाल्यावर लताने पोलिसांत धाव घेतली. सासरी होणाऱ्या मानसिक व शारीरिक त्रासाला कंटाळून लता आपल्या मुलीसह भाडेतत्त्वावर घेतलेल्या घरात स्वतंत्रपणे राहत आहे. तिला उत्पन्नाचे कोणतेही साधन नाही. त्यामुळे पतीने आपली देखभाल आणि मुलीच्या शिक्षण-संगोपनासाठी पोटगी व घरभाडे द्र्यावे, असा अर्ज लताच्या वतीने ॲड. जयपाल पाटील आणि ॲड. श्रद्धा सोट यांनी न्यायालयात केला. त्यावर पतीने पत्नीला अंतरिम पोटगी आणि घरभाड्यापोटी २७ हजार रुपये द्र्यावेत. दर महिन्याच्या दहाव्या दिवशी अंतरिम पोटगी आणि घरभाड्याची रक्कम पतीने जमा करावी तसेच सासरच्या मंडळींनी तक्रारदार महिला आणि तिच्या मुलीला कोणताही त्रास देऊ नये, असे न्यायालयाने आदेशात नमूद केले आहे

## वडीगोद्री, शहागड, गोंदी परिसरात वादळी पाऊस



दै. अधिकारनामा

**जालना :** वडीगोद्री, शहागड, गोंदी परिसरात काल (शनिवार) सायंकाळी वादळी वाऱ्यासह मुसळधार पाऊस झाला. या पावसामुळे परिसरातील कपाशी, ऊस, बाजरी, कडूळ हि पिके भूईसपाट झाली. तर फळबागांची फळगळ मोठ्या प्रमाणात झाली आहे. यामुळे शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान झाले. पावसाची वाट पाहत बसलेल्या शेतकऱ्यांना वादळी वाऱ्याने मोठा फटका दिला. मोठी व दोडे आलेली कपाशी पूर्ण खाली झोपली. यामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. महिना भरापासून पावसाचा खंड पडल्याने बळीराजा पाऊस कधी येतो याची वाट पाहत बसला होता. मात्र पावसाबरोबर वादळी वारे आल्याने सर्व पिके वाऱ्याच्या वेगाने झोपली. अनेक ठिकाणचे पत्रे उडून गेले, हॉटेलचे शेड पडले. शेतातील परिसरातील मोठं मोठी झाडे उन्मळून पडली. अनेक ठिकाणी विद्र्युत पोलही पडले आहेत. पिकांच्या झालेल्या नुकसानीमुळे शेतकरी हतबल झाला आहे. वादळी वाऱ्यामुळे नुकसान झालेल्या पिकांचे पंचनामे करण्यात यावे अशी मागणी शेतकरी वर्गातून होत आहे.